महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : श्री. किरण मोरे


- वर्ष – सोळावे
- अंक १ ला
- १ ऑक्टोबर २०२५
- पाने – २४




निनाद अभंग

# महाराष्ट्र पक्षिमित्र संघटना

संयोजीत

# वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था,अमरावती

व्दारा आयोजित

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

## ३ रे अखिल भारतीय व ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

- नोंदणी शुल्क :- १६००/-
- निवासस्थानासह : १८००/-
- वेळेवरची नोंदणी :- २०००/-

**कालावधी**

**१ व २ नोव्हेंबर २०२५ (शनिवार व रविवार)**

**स्थळ : श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतीक भवन सभागृह,अमरावती**

दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात पक्षी, निसर्ग संवर्धन व जतन या संदर्भात तज्ञांची व्याख्याने, सादरीकरण, पक्षी निरीक्षण भ्रमंती व कार्यशाळा यांचा समावेश असेल.

**✻ संमेलन नोंदणीकरीता संपर्क ✻**

अॅड. श्री. राजमेहेर निशाने - 9834912904
श्री.अमेय ठाकरे - 8999843334

**✻ संमेलन सादरीकरणासाठी संपर्क ✻**

श्री. किरण मोरे - 9923910034
डॉ. श्रीकांत वऱ्हेकर - 9423203070

# वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती

४२, ग्रीन पार्क कॉलनी, आशियाड कॉलनीजवळ, शेगाव रोड,अमरावती ४४४ ६०४
Email : wecsamt.2001@gmail.com Reg.No. MH/87/2001/AMT.

## कार्यकारिणी


प्रा. डॉ. अंजली देशमुख
अध्यक्ष


डॉ. जयंत वडतकर
सचिव


प्रा. डॉ. गजानन वाघ
कोषाध्यक्ष


प्रा. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर
उपाध्यक्ष


प्रा. डॉ. मंजुषा वाठ
सहसचिव


श्री. किरण मोरे
सदस्य


श्री. मनिष ढाकुलकर
सदस्य


श्री. सौरभ जवंजाळ
सदस्य


अॅड. राजमेहेर निशाने
सदस्य

## सल्लागार


श्री. मिलिंद चिमोटे


प्रा. डॉ. पी. बी. रघुवंशी


डॉ. राजु कसंबे

## संस्थेचे उल्लेखनीय उपक्रम

- २६ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन (२०१३)
- ११ विदर्भ पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन (२०११)
- Ornithology workshop series (2010) चे BNHS च्या सहकार्याने आयोजन.
- Birdlife international UK/ BNHS सहकार्याने Forest Owlet पक्ष्यावर सातपूड्यात संशोधन प्रकल्प यशस्वी रित्या पुर्ण -
- RRCF, मुंबईच्या सहकार्याने मेळघाटातील Owls Owlet, या पक्षावर संशोधन प्रकल्प पुर्ण.
- अमरावती जिल्ह्यातील पक्षांचा अभ्यास व पक्षीसुचिचे प्रकाशन (२०१० व २०१६)
- पक्षिविषयक पुस्तकांचे प्रकाशन -०४
- २००५ सालापासून मातिचे गणपती बसवा हा पर्यावरण जनजागृती कार्यक्रम.
- BAIF, पुणे यांचे सहकार्याने विविध प्रकल्पांचे यशस्वी आयोजन.
- वनविभागाच्या सहकार्याने विविध अभयारण्यामध्ये व व्याघ्र प्रकल्पांमध्ये पक्षी अभ्यास प्रकल्प यशस्वी पूर्ण.
- अमरावती जिल्ह्याच्या जैवविविधता नोंदवहीच्या निर्मितीमध्ये संस्थेचा सहभाग.
- पोहोरामालखेड जंगलाच्या जैवविविधतेचा अभ्यास व FES च्या सहकार्याने पुस्तीकेचे प्रकाशन

संपादक
**श्री. किरण मोरे**
विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड,
मनोर मांगल्य जवळ, अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

मार्गदर्शक
**डॉ. निनाद शहा** सोलापूर
**श्री. अविनाश कुबल** ठाणे

## कार्यकारिणी

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| संघटक | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सहसंघटक | **श्री. अविनाश कुबल,** ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सहकार्यवाह | **श्री. निनाद शहा,** सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | **सौ. रूपाली सरोज,** रेवदंडा<br>मो. ९८६९५५९९२२ |
| सदस्य | **श्री. माणिक पुरी,** परभणी<br>मो. ९८८१९६७३४६ |
| सदस्य | **श्री. नितीन मराठे,** नागपूर<br>मो. ९४२११८९३३३ |
| सदस्य | **श्री. अमोल सावंत,** अकोला<br>मो. ९८२२७२८८२३ |

## सल्लागार मंडळ

**श्री. भाऊ काटदरे** (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
**श्री. दिगंबर गाडगीळ** (पूणे) मो. ९८८१०७९७११
**डॉ. दिलीप यार्दी** (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
**डॉ. अनिल पिंपळापुरे** (नागपुर) मो. ९८८१७१३४६६
**श्री. बापुसाहेब भोसले** (अहमदनगर) मो.९८२२६३३१३३
**श्री. राजु कसंबे** (मुंबई) मो.९००४९२४७३१

**मुखपृष्ठ –**
**श्री. निनाद अभंग,** पक्षी अभ्यासक, पुणे

# संपादकीय...



तीन बाजूंनी डोंगरांनी वेढलेला तलाव. राहिलेली चौथी बाजूही सुटायला नको होती. पूर्ण उतारावर चहूबाजूंनी डोंगर असलेला तलाव फारच सुंदर दिसला असता. पण, पश्चिमेकडून काळ्या दगडी बांधाने पाणी अडवून ठेवलेले. हे बांधकाम ब्रिटिशकालीन असून १८८८मध्ये बांधल्याची नोंद तेथे आढळते. खरं तर, गावातील पाण्याची गरज भागावी म्हणून हा बांध उभारला गेला. तलावाला फुटणाऱ्या पाझरामुळे लागून असलेल्या शेतीलाही मोठा फायदा होत असे. काळानुसार गाव आणि शेतीचा मागमूसही नाहीसा झाला.

शहराची कोणती गरज हा तलाव भागवतो, हा प्रश्न पडल्यामुळे साधारण तीस वर्षांपूर्वी दगडी बांधालगत नगरपालिकेने मोठे उद्यान तयार केले. पण, आता त्याची दुरवस्था झाली आहे. बहुधा दिवसेंदिवस फुगत चाललेल्या शहराच्या विरंगुळ्याला हे जुनाट उद्यान पुरेसे ठरत नसावे. आणि त्याची दुरुस्ती करण्याची इच्छाही नगरपालिकेला झाली नाही. त्यातच या तलावालगत नवीन उद्यानाची लगबग सुरू झाली. करोडो रुपयांचा निधी त्याकरिता आणण्यात आला. तलावाच्या बाजूने जाणारा रस्ताही दुपटीने रुंद करण्यात आला. गणपती विसर्जन तलावात करू नये म्हणून कृत्रिम तलाव तयार करण्यात आला. त्यापायी काठावरचे बाभळीचे वन अर्ध्याहून अधिक संपवले गेले. जंगलातून तळ्याकडे पाण्यासाठी येणाऱ्या प्राण्यांचे लपण्याचे मार्ग कमी झाले.वर्षानुवर्षे साठलेला तलावाचा गाळ टप्प्याटप्प्याने न काढता एकदम काढला गेला. त्यामुळे तळ्याकाठची ऐन तारुण्यात असलेली परिसंस्था बाल्यावस्थेत गेली. पाणवनस्पती, छोटे मासे, मृदुशरीरी प्राणी, कवचधारी जीवजंतू, सूक्ष्म कीटक, प्लवक प्राणीसृष्टीचे अस्तित्व नाममात्र राहिले. पर्यायाने या जैवविविधतेवर अवलंबून असणाऱ्या पक्ष्यांचे प्रमाण निम्म्याहून कमी झाले. एकेकाळी आठशेच्या संख्येत येणारी स्थलांतरित मोठी लालसरी (रेड-क्रेस्टेड पोचार्ड) पक्ष्यांची संख्या आता शंभरीही गाठत नाही. पाणपक्ष्यांची घरटी पन्नासवर आली. तलावाचा एक काठ पूर्णपणे सिमेंटचा करण्यात आला. मोठ्या छत्र्या, मनोरे, आणि पाण्यात खोलवर उतरता येतील अशा पायऱ्या बांधल्या गेल्या. भविष्यात नौकाविहार, पर्यटकांना तलाव फिरवून आणणारी रेल्वेगाडीही सुरू करण्याचे बेत आहेत!

तलावाचा विकास आणि सुशोभीकरण या गोंडस नावाखाली या सर्व गोष्टी राबविल्या गेल्या. निसर्गप्रेमी आणि पक्षीप्रेमींनी, या तथाकथित विकासाला वेळोवेळी विरोध केला. न्यायालयीन लढा पुकारला. 'एनजीटी'मध्ये केस दाखल केली; त्याला यशही आले. सध्यस्थितीत बांधकामावर बंदी आली आहे. पण, आतापर्यंत तलावाचे जे नुकसान झाले ते कधीही भरून न निघणारे!

अमरावतीमधील छत्री तलाव, 'वॉशबेसिन' होण्यापासून सध्यातरी रोखला गेला आहे. पुढे असे होणार नाही, याची खात्री मात्र सर्व नागरिकांनी पर्यावरणाप्रती सजग राहिल्यानेच पटू शकते. पण, त्यासाठी जनजागृती आणि लोकशिक्षण अधिक महत्त्वाचे आहे. हे काम निरंतर व्हायला हवे. कारण, काठावर मोठाले स्पीकर लावून गाण्याद्वारे ध्वनीप्रदुषणाची कमाल मर्यादा गाठण्याची स्पर्धा रोज खेळली जाते. निर्माल्याची व्यवस्था असूनही तलावात प्लास्टिक कॅरीबॅगसह कचरा टाकला जातो. तलावाच्या काठावरील झुडपी जंगलात, झाडांवर जागोजागी मातीची भांडी (पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी) टांगली जातात. घरून बाटलीत पाणी आणून त्यात ओतले जाते. पक्ष्यांना खाण्याची आबाळ होऊ नये म्हणून स्टँड करून ठेवले जातात; त्यावर नियमितपणे दाणे आणि खरकटे टाकले जाते. हे निव्वळ भूतदयेपोटी होत नाही. आपल्या हातून घडणारे, हे छोटेसे 'निसर्गसंवर्धन' हा त्यांचा (चुकीचा) समज तितकाच महत्त्वाचा! निसर्गामधला आपला हा हस्तक्षेप पक्षी-प्राण्यांच्या नैसर्गिक सवयी मोडतो आहे, याची त्यांना जराही कल्पना नसते.

व्हॉट्सअॅप आणि फेसबुकसारख्या विद्यापीठातून पदवी घेऊन आलेले काही लोक पर्यावरणसंवर्धनाची धुरा सांभाळल्यागत कामाला लागतात. समाजमाध्यमांचा अल्गोरिदम याला कारणीभूत! पण, तो योग्य माहितीने फिल्टर करून घेण्याकडेही काहींचा कल असतो. आणि त्यासाठी पक्षी, पर्यावरण; तसेच मानव यांचा सहसंबंध, शास्त्रीय संशोधन, निरीक्षणावर आधारित माहिती अथवा लेख, यागोष्टी पर्यावरण संवर्धनास हातभार लावतात. शासनाकडे संवर्धनासंबंधी जनसामान्यांचा रेटा लावण्यास सहाय्य करतात.

पक्षीप्रेमींच्या जनजागृतीसाठी 'पक्षीमित्र,' हा अंकही महत्त्वाची भूमिका बजावतो. यातील अभ्यासपूर्ण लेख, पक्ष्यांवरील माहिती, या अभ्यासाद्वारे निसर्गसंवर्धनाकडे नेतात. ऑक्टोबरच्या या अंकात पक्षीसंशोधनात कार्यरत असणाऱ्या संशोधकाचा लेख समाविष्ट केला आहे. त्यातील निरीक्षणे आणि माहितीमुळे आपल्या परिसरातील पक्षीसृष्टीबद्दल आपण सजग होऊ या; आणि त्याचा पुढील टप्पा संवर्धनात्मक पावले उचलण्यासंबंधी राहील, ही खूणगाठ नक्की करू या!

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com

सप्रेम नमस्कार,

'पक्षीमित्र'चा हा अंक आपल्या हाती येईल, त्यावेळी वन्यजीव सप्ताहास सुरुवात झालेली असेल. भारतातील वन्यजीव संवर्धनासाठी हा सप्ताह आपण सुमारे ७५ वर्षांपासून साजरा करीत आहोत; मात्र, वन्यजीव संवर्धनाबाबत सर्वसामान्यांमध्ये पुरेशी जनजागृती झालेली आहे, असे ठामपणे सांगणे कठीण आहे. हा विषय आजही एका ठराविक टक्केवारीपुरता मर्यादित आहे, असे मला वाटते. वन्यजीव संवर्धन आणि पाळीव प्राणी-भूतदया या दोन्ही गोष्टींतील फरक करताना अनेकांची गफलत होताना दिसते. सहज एक गोष्ट सांगतो. मी समाजमाध्यमांवर बऱ्यापैकी सक्रीय असतो, हे आपल्याला माहिती आहे. महत्त्वाची माहिती देण्यासाठी किंवा एखाद्या कार्यक्रमाची प्रसिद्धी करण्यासाठी हे एक उत्कृष्ट माध्यम आहे. मी पक्षिनिरीक्षण किंवा जंगलातील भटकंतीच्या पोस्ट नियमितपणे प्रसारित करीत असतो.

काही महिन्यांपूर्वी असेच एकदा मुंबईजवळील वसईच्या समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या एका पाहुण्या पक्ष्याला पाहण्यासाठी गेलो होतो. पक्षी पाहून झाल्यावर भूक लागल्याने आमच्या स्थानिक मित्रांनी नाश्त्यात त्या ठिकाणचे वैशिष्ट्य असलेल्या 'चिकन भुजिंग'ची मेजवानी दिली. यावरील पोस्टवर मला, 'सर, तुम्ही पक्षिमित्र असूनसुद्धा चिकन कसे खाऊ शकता,' अशी कमेंट करून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. आता काय बोलणार, असो!

गेल्या दोन-तीन महिन्यांत भारतात आणि महाराष्ट्रात दोन विषय मोठ्या प्रमाणावर गाजले. त्यातील एक भटक्या कुत्र्यांचा तर दुसरा शहरातील कबुतरांचा! गेल्या काही दिवसांत मुंबईतील कबुतरखान्याचा विषय सर्वत्र चर्चेत आहे. मुंबईसह अनेक मोठ्या शहरांत कबुतरांची संख्या अतोनात वाढल्यामुळे या वाढलेल्या संख्येचा फटका, सर्वप्रथम बसला तो शहरातील पक्ष्यांच्या विविधतेला!

शहरातून चिमण्यांची संख्या कमी झाल्याची चर्चा, सुमारे २० वर्षांपूर्वी प्रथम सुरू झाली होती. त्यावेळी त्याची जबाबदारी आपण मोबाईलच्या ध्वनिलहरींवर ढकलून मोकळे झालो होतो. नंतर, हळूहळू एकेक पक्षी मोठ्या शहरांतून हद्दपार होऊ लागला. कबुतरांच्या वाढत्या संख्येने, त्यांच्या आक्रमक व निडर स्वभावाने आणि त्यांच्या मोठ्या आकाराने त्यांनी इतर पक्ष्यांना हाकलून लावले. त्यांच्या निवाऱ्याच्या जागा व अन्न त्यांनी काबीज केले. आज अनेक शहरांतून, पूर्वी सामान्यपणे दिसणारे पक्षी गायब झाले आहेत. त्यांच्या जागी फक्त कबुतरेच दिसून येतात.

कबुतरे ही मुळात जंगलीच होती. ती डोंगराळ भागातील कडेकपारीत राहत असत. आजही काही ठिकाणी अशी जंगली कबुतरे दिसतात. तेथे त्यांची संख्या नियंत्रित असते; कारण, त्यांना निसर्गात स्वतःला संघर्ष करून जगावे लागते. कधीकाळी मानवाने कबुतरांना पाळीव केले. ते शहरात राहू लागले. आज शहरात वाढलेली संख्या ही त्यांचीच वंशज असून ती मानवी वस्तीत राहण्यास सरावलेली आहेत.

अलीकडे शहरात निर्माण होत असलेल्या उंच इमारती ही संख्या वाढीचे आणखी एक कारण ठरले आहे. अशा इमारती त्यांना घरट्यासाठी सुरक्षित जागा पुरवतात. दुसरे कारण म्हणजे भूतदयेच्या भ्रामक कल्पनेपायी त्यांना मोठ्या प्रमाणात धान्य टाकले जाते. या कारणाने त्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. मुंबईतील दादर असो की 'गेटवे' समोरील पटांगण; या ठिकाणी त्यांना लोक मोठ्या प्रमाणात धान्य टाकतात. धान्यासोबत काही लोक शेव, फूटाणे, पापडी असे कबुतरांसाठी अखाद्य असणारे पदार्थसुद्धा टाकतात. यामागे भूतदया असली; तरी अलीकडे त्याचे प्रमाण खूपच वाढलेले आहे.

काही लोक आपले नवस पूर्ण करण्यासाठी, तर काही जण आपल्या जास्तीच्या कमाईतील हिस्सा या कबुतरांना देतात. जास्तीचा पैसा आला म्हणून मग गोण्या-गोण्या भरून धान्य एकाच वेळी टाकले जाते. कबुतरे ते कायम खातानाच दिसतात. त्यामुळे, 'ते भुकेले होते आणि मी त्यांना खायला दिले,' हे समाधान, धान्य टाकणाऱ्याला मिळते. परंतु, मुळात ते कबुतरांच्या पचनी पडत नाही. अजीर्ण होऊन अनेक कबुतरे मरतातसुद्धा!

एखाद्या प्राण्याची, एकाच ठिकाणी संख्या वाढली की रोगराई पसरण्याचा धोका वाढतो. हे, त्यांच्यासाठी व त्या परिसरातील इतरांसाठीही धोकादायक असते. कबुतरांमुळे अलीकडे अनेक आजार पसरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्या विष्टेवर वाढणाऱ्या एका बुरशीमुळे रोग पसरू लागले आहेत. तर त्यांच्या पंखांतील तंतुमुळे श्वसनाचे रोग होऊ लागले आहेत. त्यांच्या विष्टेमुळे घाण होते व दुर्गंधी पसरते. तसेच जास्तीचे टाकलेले अन्न सडूनसुद्धा दुर्गंधी व बुरशी पसरते. त्यामुळे, शहरातील कबुतरांच्या वाढत्या संख्येवर तातडीने नियंत्रण आणणे गरजेचे आहे.त्यासाठी प्रथम त्यांना धान्य टाकण्याच्या जागा बंद

करायला हव्यात. आपल्या घरावर जर ते घरटे करीत असतील तर त्या जागा बंद कराव्यात म्हणजे ते तेथून हळूहळू निघून जातील. निसर्गाने प्रत्येक पक्ष्याला आपले अन्न निसर्गात शोधण्याचे कसब आणि ते अन्न, उपलब्ध करून दिले आहे. जे आपले अन्न शोधण्यासाठी प्रयत्न करतील, तेच पर्यावरणीय अन्नसाखळीत आवश्यक तेवढ्या संख्येने टिकतील; यात काही शंका नाही.

मी, हे लिखाण पूर्ण करत असतानाच आणखी एक बातमी कानावर पडली. मुंबईची हरित फुप्फुसे असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात, आता सरकार कबुतरखाना सुरू करणार आहे, म्हणे! या प्रकारास आता काय म्हणावे? ह्या एकूणच विषयांवर सविस्तर चर्चा यापुढे व्हायला हवी.

दुसरा विषय हा भटक्या कुत्र्यांचा! हा विषयसुद्धा फार गंभीर आहे. भटक्या कुत्र्यांची अतोनात वाढलेली संख्या मानवासाठी व वन्यप्राण्यांसाठी धोकादायक ठरली आहे. मात्र भूतदयेच्या भ्रामक कल्पनेपायी हा विषय कुत्रा-प्रेमींनी चिघळवला. आज अनेक वन्यप्राणी या भटक्या कुत्र्यांना बळी पडत आहेत. हिमालयातील दुर्मिळ काळ्या मानेचे क्रौंचपक्षी यांच्यासह अनेक प्राणी त्यांच्या दहशतीखाली आहेत. शहरात फिरताना लहान मुले, तसेच वृद्ध माणसेही दहशतीत आहेत. या दोन्ही विषयांवर शास्त्रीय दृष्टीकोनातून मार्ग निघायला हवा; मात्र तसे होताना दिसत नाही.

येणारे ३८ वे 'महाराष्ट्र पक्षीमित्र' संमेलन अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या (थएउड) यजमानपदाखाली येत्या नोव्हेंबरमध्ये, दिवाळीनंतर दहा दिवसांनी म्हणजे १ व २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणार आहे. या संमेलनाची नोंदणी सुरू झाली असून त्याची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या वर्षीचे संमेलन भव्य व अविस्मरणीय करण्याचा आमचा मानस आहे. हे संमेलन खऱ्या अर्थाने 'अखिल भारतीय' व्हावे यासाठीही प्रयत्न राहील. त्यासाठी विविध राज्यांतील पक्षी-अभ्यासक व संशोधक या संमेलनात सहभागी व्हावेत, असा आपला प्रयत्न सुरू आहे.


या संमेलनास जोडून इच्छुकांसाठी मेळघाट सहल तसेच काही कार्यशाळा व विविध स्पर्धांचेही आयोजन केले जाणार आहे. तेव्हा अमरावतीला येण्याचे नियोजन करा. आम्ही आपल्या स्वागतास उत्सुक आहोत.

।। मिळून सारेजण, करू द्विजगण रक्षण ।।

*****

## वाचक प्रतिक्रीया

### पक्षीमित्र'चा जुलै २०२५ चा अंक: एक अविस्मरणीय अनुभव!




जुलै २०२५ चा 'पक्षीमित्र' अंक हाती पडला आणि एका बैठकीत तो वाचून पूर्णही केला. मन नितांत सुंदर अंकाच्या वाचनाने तृप्त झाले. या अंकातील प्रत्येक लेख इतका अप्रतिम होता की तो केवळ माहिती देत नव्हता, तर वाचकाच्या मनाला स्पर्श करत होता.

अंकाचे मुखपृष्ठ डोळ्यांत भरण्यासारखे होते - हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर नुकतेच दिवंगत झालेले ज्येष्ठ पक्षी अभ्यासक, कै. मारुती चितमपल्ली सरांचे छायाचित्र मन वेधून घेत होते. सरांच्या स्मृतींना उजाळा देणारे संपादकीय आणि अध्यक्षीय लेख वाचताना, तसेच अविनाश कुबल आणि डॉ. अनिल माळी यांचे लेख वाचताना चितमपल्ली सरांबद्दलचा आदर अनेक पटींनी वाढला. त्यांच्या कार्याची महती पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

डॉ. जयंत वडतकर सरांनी 'स्पर विंग्ड लॅपविंग' पाहण्यासाठी तेलंगणातील वारंगलला केलेला प्रवास आणि डॉ. राजू कसंबे यांनी पत्नीचा वाढदिवस साजरा करण्याच्या बहाण्याने आक्षी बीचवर केलेला पक्षी अभ्यास व छायाचित्रण, हे दोन्ही लेख त्यांच्या खुमासदार शैलीमुळे अफलातून झाले आहेत. वाचताना आपणही त्या पक्षी निरीक्षणाच्या प्रवासाचे भाग आहोत असे वाटते.

किरण मोरे यांनी चंडोलवर लालित्यपूर्ण भाषेत लिहिलेला लेख, डॉ. प्रमोद वाठोरे यांचा 'मचानावरील पाखरे' हा लेख, प्रशांत निकम यांचा फोटोग्राफीवरील लेख आणि रवींद्र वामनाचार्य यांचा 'टपाल तिकिटांच्या दुनियेतील' या सदरातील लाल मुनियावरील लेख - हे सर्वच लेख केवळ माहितीपूर्ण नव्हते, तर तितकेच मनोरंजकही होते. प्रत्येक लेख वाचकाला पक्षीविश्वाच्या अनोख्या पैलूंशी जोडून ठेवत होता. एकूणच, 'पक्षीमित्र'चा हा अंक खऱ्या अर्थाने पक्षीप्रेमींसाठी एक अनमोल भेट ठरला आहे.

**राजेंद्र रामचंद्र घोडके**
चावरे, जिल्हा कोल्हापूर

# रातथारा व सारंगागारः एक ओळख, अभ्यास व संवर्धन



**प्रा. डॉ. गजानन वाघ**
पक्षी-अभ्यासक, संशोधक तथा
कार्यवाह, महाराष्ट्र पक्षीमित्र

पक्ष्यांचे काही समूह रात्रभर गावातील, शहरातील तसेच पाणवठा व नदी-नाल्यांजवळ असलेल्या झाडांवर सायंकाळ होताच समूहाने किलबिलाट करत झाडांवर जमा होतात आणि रात्रभर तेथील वृक्षांवर आश्रयाला राहून सकाळी पुन्हा वेगवेगळ्या दिशेने उडून जातात. पोपट, मैना, कावळे, बगळे, ढोकरी, करकोचे, शराटी, इत्यादी पक्षी-प्रजाती सुरक्षित व रात्रीच्या निवाऱ्यासाठी आवडलेल्या झाडांवर वर्षानुवर्ष येत असतात. अशा जागेला इंग्रजीत 'रुस्टिंग प्लेस' म्हणतात. या स्थानासाठी 'रातथारा, रातनिवारा किंवा रातआसरा,' अशा शब्दांचा वापर ज्येष्ठ पक्षी अभ्यासक पद्मश्री स्वर्गीय मारुती चितमपल्ली सर यांनी त्यांच्या 'पक्षिकोश,' या पुस्तकात केला आहे.

बगळे, ढोकरी, पाणकावळे, शराटी, करकोचे, इत्यादी पक्षी-प्रजाती पावसाळ्याच्या सुरुवातीला तलावांकाठच्या, नदी-नाल्यांच्या काठावरील उंच व सुरक्षित अशा देशी वृक्षांवर समूहाने घरटी बांधून पिल्लांना वाढवतात. अशा जागेला इंग्रजीत 'हेरॉनरी' म्हणतात. श्री. चितमपल्ली सरांनी या जागेला मराठीत 'सारंगागार,' असे संबोधिले आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या कार्याबद्दल तसेच पक्षी-अभ्यास व पक्षी-संशोधन याबद्दल आमच्याकडून जाणून घेताना श्री. मारुती चितमपल्ली सर नेहमी म्हणायचे की, आपल्याला गावातील, शहरातील तसेच तलाव परिसरातील, नदी काठावरील मोठे जुने वृक्ष वाचवायचे आहेत. तसेच, त्यांचे संवर्धनही करायला पाहिजे. वड, पिंपळ, चिंच, कडूनिंब, बाभूळ, काटेसावर, अशा अनेक देशी वृक्षांचे पक्षिमित्रांनी संवर्धन करावे असे ते आवर्जून सांगत असत आणि त्यासंबंधीच्या सूचनादेखील ते नेहमीच करीत असत. आदरणीय श्री. मारुती चितमपल्ली सरांच्या सूचना तसेच महाराष्ट्र पक्षीमित्रचे वरिष्ठ पक्षिअभ्यासक तथा सदस्य श्री. शरद आपटे सरांनी 'रातथारा पक्षिगणना,' या संदर्भात 'महाराष्ट्र पक्षीमित्र'च्या ऑफिसशी केलेला पत्रव्यवहार व तश्या सूचना लक्ष्यात घेऊन, मी आणि माझ्या मार्गदर्शनात संशोधन करणाऱ्या विध्यार्थ्यांनी अमरावती शहरातील बगीचे व शहर-सभोवताल असलेल्या पाणवठ्याजवळील स्थळांना भेटी देवून, तेथील रातथारा व सारंगागार यांबाबत अभ्यास करायचे ठरविले. अमरावती शहरातील पोपट, कावळे आणि गाय बगळे यांचा रातथारा व त्यांच्या विणीचे ठिकाण, म्हणजेच सारंगागार, याबाबतच्या नोंदी व शास्त्रीय पद्धतीने तेथील अधिवासाचा केलेला संपूर्ण अभ्यास, हा त्याचाच एक भाग म्हणता येईल.

अमरावती शहराच्या मध्यभागी असलेल्या राजापेठ, पोलीस स्टेशन परिसरात रोज सायंकाळी हजारोंच्या संख्येने पोपट तेथील झाडांवर मुक्कामाला निवाऱ्याला असत. त्यांची संख्या जवळपास साडेतीन ते चार हजार इतकी आढळून आली. त्यांमध्ये तिन्ही प्रजातींचे पोपट  म्हणजेज करण पोपट, पोपट आणि टोई पोपट. मानेवर रिंग असलेले पोपट मात्र मोठ्या संख्येने मुक्कामाला आढळून आले. राजापेठ पोलीसठाणे हे शहराच्या वर्दळीच्या भागात असले, तरी तिथे वड, पिंपळ, कडूनिंब, इत्यादी प्रजातींचे मोठे व जुने वृक्ष आहेत. या परिसरात मोठे वृक्ष, रात्रभर प्रकाश, आणि अधिकची सुरक्षितता अशा बाबींमुळे या पक्ष्यांच्या प्रजाती रात्रीला इथे मुक्कामाला असतात, असेच म्हणावे लागेल. अमरावती शहराच्या पूर्वेकडील भागात 'तपोवन' परिसर आहे. तपोवन म्हणजे कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी डॉ. पटवर्धन यांनी १९५०मध्ये स्थापन केलेले निवासी आश्रम आणि सेवा केंद्र. या परिसरात अनेक प्रकारचे जुने व उंच असे वड, पिंपळ, चिंच व सागाचे वृक्ष आहेत. तिथे, अमरावती शहरातीलच नव्हे तर आजूबाजूच्या गावांमधूनसुद्धा कावळे सायंकाळी मोठ्या संख्येने जमा होतात आणि तेथील वृक्षांवर रात्रीला ते निवाऱ्याला असतात. अमरावती शहरातील कावळे नेहमी सायंकाळी कुठे बसत असतील, या गोष्टीचा उलगडा करण्याकरिता मी, सुट्टीच्या दिवशी म्हणजेच एका रविवारी सायंकाळी माझ्या घरावरून उडणाऱ्या कावळ्यांवर लक्ष ठेवून त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आणि जवळपास पाच ते सहा किलोमीटरवर





असलेल्या तपोवन परिसरात कावळ्यांचा 'रातथारा' शोधण्यात मला यश मिळाले. कावळ्यांच्या रात्रीच्या बसणाऱ्या या जागेला श्री. मारुती चितमपल्ली सरांनी, 'काकागार,' असे संबोधले आहे. आणखी अशाच प्रकारचे एक कावळ्यांचे आश्रयस्थान 'काकागार' मला अमरावती–नागपूर रस्त्यावरील, मोझरी या गावातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आश्रम परिसरात आढळून आले. अमरावती शहरापासून जवळच असलेल्या राजुरा, शेवती या तलावांच्या मध्य भागात असलेल्या काटेरी बाभळीच्या झाडांवर गाय बगळे मोठ्या संख्येने जमा होतात आणि तिथेच ते रात्रीला मुक्कामी असतात. सावंगा विठोबा–तलाव परिसरात असलेल्या अर्जुन आणि चिंच, या वृक्षप्रजातींवर आम्हाला रात ढोकरी या पक्ष्यांचा रातनिवारासुद्धा आढळून आला. अमरावती–चांदुर रेल्वे मार्गावरील अमरावती महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असलेल्या जुन्यावडाळी बगीच्यामध्ये, तेथील अशोकांच्या व पिंपळाच्या झाडावर मोठ्या प्रमाणात गाय बगळे, ढोकरी व पाणकावळे या पक्षी–प्रजातींची घरटी मोठ्या प्रमाणात जून–जुलै महिन्यात पहायला मिळाली. गाय बगळे, ढोकरी, पाणकावळे, करकोचे व शराटी यांसारख्या पाणपक्ष्यांचे आश्रयस्थान व सारंगागार यांची नोंद प्रथमच अमरावती शहर व सभोवतालच्या परिसरात करण्यात आली. अमरावती शहर व परिसरात रातथारा, सारंगागार अशा स्थळांची नोंद व शास्त्रीय पद्धतीने तेथील वृक्ष आणि अधिवासाचा अभ्यास करीत असताना असे लक्षात आले, की गावातील व शहरातील पक्षी रात्रीला सुरक्षित भागात जुन्या, मोठ्या, उंच असलेल्या देशी वृक्षांवर मुक्काम करणे पसंद करतात. त्यामुळे, गावातील, शहरातील व तलावाकाठचे देशी वृक्ष, उदाहरणार्थ चिंच, वड, पिंपळ, कडूनिंब, कवठ, काटेसावर, अर्जुन, इत्यादी वृक्ष प्रजातींना संरक्षण देणे, तसेच गावभोवताल व शहरातील उद्यानात आणि कॉलनीच्या छोट्या बगीच्यात, अशा प्रकारच्या देशी वृक्षांची लागवड करून, या पक्षी–प्रजातींना आपण आश्रय देऊ शकतो आणि एकूणच त्यांचे संवर्धन करू शकतो. त्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्रातील पक्षिमित्रांनी आपल्या गावातील ग्रामपंचायत व शहरातील नगरपरिषद आणि नगरपालिका यांच्या सहयोगाने मोठ्या प्रमाणात देशी वृक्षांची लागवडव तिथे असलेल्या उंच आणि मोठ्या, अशा देशी वृक्षांना 'वारसा वृक्ष,' असे संबोधून त्यांचे संवर्धन करावे; जेणेकरून गावातील व शहरातील पक्ष–जैवविविधतेचे जतन व संवर्धन होईल. आणि हीच श्री.मारुती चितमपल्ली सरांना खरी श्रद्धांजली ठरेल. या लेखाच्या निमित्ताने नवोदित पक्षिमित्रांना 'रातथारा' व 'सारंगागार' या शब्दांची ओळख करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न.

*****



# परभृत गण जीवशी Cuculiformes
# (उर्फ ककू/कोकीळ)



**शरद आपटे**
जेष्ठ पक्षीतज्ञ, नाशिक

कुठे आहेऽस, कुठे आहेऽस, तू कुठे आहेऽऽस, तू कुठे आहेऽऽस!

करूण स्वरांनी ओथंबून भरलेली ही साद, मी बिछान्यावर पडल्या-पडल्या ऐकत होतो. त्या करूण हाकेने मीही व्याकुळ होऊन गेलो. उत्तर रात्रीचा प्रहर! छतावर भिरभिरणारा पंखाहीग्रीष्मातील तो दमट उष्मा शमवू शकत नव्हता. त्यातच ही साद मला बेचैन करत होती. कोण, बरे? ती, का तो? कुणाला, आणि काबरे, साद घालीत असेल. पुन्हा तीच हाक! पुन:पुन्हा!

आतामात्र मी उठलो सरळ गच्चीवर दबक्या पावलांनी पोहोचलो. हवा कुंद, दमट,आणि उष्ण! आभाळ अभ्राच्छादित, त्यामुळे उष्मा आणखिनच जाणवत होता. पौर्णिमेची रात्र असूनही चंद्रमा ढगात लपलेला होता; तरीही त्याचा मंद, दुधी प्रकाश, सर्वत्र पसरला होता. थोड्याचवेळात; कदाचित, माझी चाहुल लागल्याने थांबलेली ती करूण साद, पुन्हा सुरू झाली.'कुठे आहेऽस, कुठे आहेऽस, तू कुठे आहेऽऽस, तू कुठे आहेऽऽस!'

माझ्या घराच्या पश्चिमेस असलेल्या औदुंबरवृक्षाच्या टोकावरून ती साद येत होती. मी कानाचा वाडगा करून ऐकू लागलो. एकंदर 'ककू' जातकुळातील हा पक्षी असावा, असा मी कयास केला. पक्षी ओळखणे आतातरी शक्य नसल्याने मी सकाळी परत येण्याचा वादाकरून पुन्हा 'तू कुठे आहेस' अशी साद ऐकत झोपलो.

सकाळी, अगदी भल्या पहाटेच मी सर्व साधनांसह गच्चीवर पोहोचलो; तेंव्हाही त्याची किंवा तिची ती साद सुरू होतीच. प्रथम ध्वनी मुद्रण सुरू केले. कारण, अजूनही पुरेसे उजाडले नव्हतेच. त्याच्या सादेतील 'तू कुठे आहेस' ही साद आता वारंवार ऐकू येवू लागली. आभाळ जसे फटफटले, तशी मी दुर्बीण डोळ्याला भिडवली. शेंड्यावारील पानात एक बुलबुलपेक्षा किंचित मोठा, थोडी लांब शेपूट असलेला, काळा-कबारा पक्षी बसला होता आणि तोच ही साद देत होता. मी ताबडतोब,'बर्ड्स ऑफ दी इंडिअन सबकॉंटिनंट' हे पुस्तक काढलं आणि थेट ककू या पानावर गेलो. मी पहात आणि ऐकत असलेला हा पक्षी, 'ग्रे बेलीड ककू' म्हणजे, 'कारुण्य कोकीळ'चा नर आहे, हे लक्षात आले. त्याचे शास्त्रीय भाषेतील नाव जरा अवघड आहे, 'कोकोमॅंटिस पॅसरिनस,' 'ककू चिमणी,' असा त्याचा सरळ अर्थ होतो. कोकोमॅंटिस म्हणजे अशुभ-वाणी वा संदेश आणणारा अथवा सांगणारा पक्षी, म्हणजे आपली'कारुण्य कोकीळ,' लॅटिन भाषेनुसार हा अशुभसंकेत आणणारा पक्षी!

जगामध्ये आज मितीस ११००० पक्षी प्रजातींची नोंद असून त्यांचे ३६ गणांमध्ये (Orders) वर्गीकरण करण्यात आले आहे. हे गण त्यांची उत्क्रांती, पेशींची रचना, शरीराची ठेवण, अन्न मिळविण्याच्या सवयी, यावरून ठरतात. या गणांत अनेक कुळे (फॅमिली) असतात. ती आणखीन एकमेकांच्या जवळ येतात. उदा. कुलिंग (फांदीधारी/ Passeriformes) गणात चाळीस कुळे आहेत त्यात आपली चिमणी पासर कुळात (कुटुंबात) येते. ककू हे पक्षी ककुलीफॉर्मिस गणात मोडतात. या गणात ३३ कुळे आहेत आणि त्यात १४७ प्रजाती आहेत. भारतीय उपखंडात या गणातील १० कुळात मिळून २५ प्रजाती आढळतात.त्यापैकी ७ कुटुंबातील (Clamator, Hierococcyx, Cuculus, Cacomantis, Chrysococcyx, Surniculus, Eudynamys) १६ प्रजाती या स्वत:चे घरटे बांधत नाहीत. ते दुसऱ्या एखाद्या पक्ष्याच्या घरट्यात आपली अंडी देतात; जसे कोकिळा ही गाव-कावळ्याच्या घरट्यात अंडी देते, तसे! ककू, कोकीळ, माल्कोहा, भारद्वाज अशी कुळे ही ककुलीफॉर्मिस गणात आहेत.

ककू हे मध्यम आकारचे आणि लांबट दिसणारे असतात. बहुत करून नर मादी सारखेच दिसतात. मात्र, काही प्रजातीत नर-मादी वेगळे दिसतात. सर्व ककू वृक्षारोही म्हणजे झाडावर वावरणारे आहेत आणि त्याचे अन्न प्रामुख्याने किटक आणि त्यांच्या अळ्या आहेत.

प्रजोत्पादन

पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीवाचे पुढच्या पिढीला जन्म देणे हे जणू आद्य कर्तव्य असते. सस्तन प्राणी पिलाला जन्म देतात, किटक अंडी, अळी, आणि कोश या तीन पायऱ्यांतून जातात. सरपटणारे प्राणी आणि पक्षी, अंडी देतात. काही सरपटणारे प्राणी घरसदृश रचना करतात. काही पक्षी प्रजाती उदा. रातवे, टिटवी वगळता बाकी सर्व घरटी बांधतात किंवा तत्सम जागांचा वापर करतात. ककू कुटुंबातील पक्षी



मात्र घरटे तर बांधत नाहीतच; उलट दुसऱ्या पक्ष्याने बांधलेल्या घरट्यात काहीवेळा त्याची अंडी काढून आपली घालतात. वरील १६ प्रजाती कोणत्या पक्ष्याच्या घरात अंडी देतात हे जवळजवळ ठरलेले आहे.वास्तविक आपली अंडी दुसऱ्याच्या घरट्यात देण्याचे काम एकटे ककूच करतात असे नाही. रेड-हेडेड डक आणि इंडिगो बर्ड हे आपली अंडी दुसऱ्याच्या घरट्यात देतात; मात्र ते घरटे स्व-प्रजातीचे असते. म्हणजे रेड-हेडेड डक हे दुसऱ्या रेड-हेडेड डकच्या घरट्यात अंडी देईल. ब्राऊन-हेडेड काऊबर्ड (Molothrus ater) हा अमेरिका खंडात सपडणारा गैर ककू वर्गातील; पण दुसऱ्या प्रजातीच्या घरट्यात अंडी घालणारा पक्षी आहे. हा सुमारे वेगवेगळ्या २०० प्रजातींच्या पक्ष्यांच्या घरट्यात अंडी देतो. हनी गाईड हाही असाच एक पक्षी, जो दुसऱ्या प्रजातीच्या घरट्यात अंडे देतो. याच्या पिलाला जन्मताच एक अणकुचीदार दात चोचीत असतो. त्याने तो यजमान पक्ष्याचे अंडे फोडतो आणि स्पर्धा तेथेच संपवतो.

या प्रजातीच्या नर-मादी जोडी जमणे (Pairing), प्रणयाराधन (Courtship), मिलन (Mating) यांबाबत अद्याप पुरेशी माहिती नाही. नर-मादी सारखेच दिसत असल्याने, त्यांना वेगळे ओळखणेही कठीण जाते. नर गातो म्हणून केवळ त्यावेळीच तो नर म्हणून ओळखता येतो. ककुलस (Cuculus), कॅकोमँटिस (Cacomantis) या कुलातील माद्या ज्यावेळी तांबूस बदामी रंगात असतात तेंव्हा त्यांना वेगळे ओळखता येते. हा बदामी रंग त्यांना केव्हा आणि का येतो, याबाबत माहिती मिळत नाही. मादी-पक्षी मुळातच लपून-छपून वावरणारा असल्याने तो सहसा दिसत नाही. किंबहुना यातील मादी कधीही दिसत नाही. मी इतक्या वर्षात एकदाच एक मादी पाहिली आहे आणि चातकाचे मिलनही एकदाच पाहिले आहे.

अंडी: ककूशिवाय काही प्रजाती दुसऱ्याच्या घरट्यात अंडी घालतात हे आपण पाहिले. मात्र, ते आपल्या अंड्यांचा आकार आणि रंग यात बदल करीत नाहीत. ककू हे यजमान पक्ष्याच्या अंड्याच्या आकाराची आणि रंगाचीही नक्कल करतात. सर्वसाधारण पक्षी, त्यांचा आकार आणि त्यांच्या अंड्याचे आकार याचे प्रणाम ठरलेले असते. म्हणजे, मैनेच्या अंड्याचा आकार चिमणीच्या अंड्यापेक्ष्या मोठा असणार. मात्र, ककू ज्या पक्ष्याच्या घरट्यात अंडी घालतो त्या पक्ष्याच्या अंड्याच्या आकाराची आणि रंगसंगतीची नक्कल करतात. इतकेच काय, ककुचे अंडे यजमान पक्ष्याच्या अंड्याप्रमाणे तीच सांकेतिक (अंड्यातील जीव अंडे उबविणाऱ्या पालक पक्ष्याशी सांकेतिक भाषेत संवाद साधत असते) भाषा वापरते. ककू हे सर्वसाधारणपणे गाणाऱ्या (Song bird) गटातील पक्ष्यांच्या घरट्यात अंडी देतात. हे पक्षी सहसा सकाळी अंडे घालतात. दुपारच्यावेळी यजमान पक्षी घरट्यात नाही हे पाहून ककू आपले अंडे दुपारी घालते. ककूची मादी यजमान पक्ष्याच्या मादीच्या तुलनेने कमी वेळेत अंडे घालते. 'कारुण्य कोकीळ'च्या पिलाला मी जांभळ्या पाठीचा सुर्यपक्षी(शिंजीर) पक्ष्याने वाढविताना पहिले आहे. म्हणजे ककूने शिंजीर पक्ष्याच्या अंड्याच्याआकाराइतके अंडे घातले असणार. हेपण आपण तपासू शकू. ककू एकच अंडे यजमान पक्ष्याच्या घरट्यात घालतो. काहीवेळा पहिली अंडीही काढून टाकतात. ककुचे अंडे लवकर उबते आणि ते पिलू अंड्यातून बाहेर पडताच प्रथम इतर अंडी आणि पिल्ले घरट्यातून बाहेर ढकलून देते. ककुचे पिलू हे सतत साद घालून अन्न मागत राहते त्यामुळे पालक पक्षी त्यालाच अन्न जास्त भरवितात. पिलांच्यातोंडातील रंग आणि जीवणीचा भडक रंग पालक पक्ष्यास अन्न भरविण्यास उद्युक्त करतात. ककुच्या पिलाच्या तोंडातील रंग आणि खुणा तसेच जीवणीचा रंग आणि खुणा जास्त आकर्षक असतात; साहजिकच पालक पक्षी त्या पिलांना जास्त अन्न भरवितात. ही गोष्ट आपल्याला कोकिळेच्या पिलाच्या बाबतीत सहज पहाता येते. मी आतापर्यंत जेवढी ककूची पिले यजमान पक्षी वाढविताना पहिली आहेत, ती एक-एकटी होती. मात्र, कोकिळा एकापेक्ष्या जास्त अंडी देते. मी अनेकवेळा गाव-कावळ्याला एकापेक्षा जास्त कोकिळेच्या पिलांना वाढविताना पहिले आहे. आणि दरवर्षी पहातही आहे. कावळ्याच्या एकाच घरट्यात एक कोकिळेचे आणि एक कावळ्याचे पिलू, असाही प्रकार एकदा माझ्या पहाण्यात आला आहे. इथे कोकिळेच्या पिलाला कावळा झाडावर जाऊन भरवित असे आणि त्याचे पिलू जे त्याच्या सोबत जमिनीवर येत असे त्याला तिथेच भरवित असे. अन्नाचा प्रकार मात्र दोघानाही एकच असे. ककुचे पिल्लू पालक पक्ष्याकडून अन्न मिळेपर्यंत आणि तितकेच त्याच्या जवळ रहाते; अन्न मिळताच ते बाजूला होते. शिवाय, ककुचे पिल्लू कधीही पालक पक्ष्याच्या मागे अन्न मागत फिरत नाही. उलट पालक पक्षी त्याला त्याच्या जागेवर जाऊन अन्न देत रहातो.

मुळात ही वृत्ती का निर्माण झाली याचे कोडे अद्याप सुटले नसलेतरी ककू प्रजातीतील पक्षी एकावेळी अनेक घरटी करीत असत आणि त्याचा त्यांना सांभाळ करता येत नसे, आणि दुसरे म्हणजे या गटातील पक्ष्यांना आपल्या घरट्यांचे आणि पिलांचे संरक्षण करणे



जमेना; तेंव्हा ही युक्ती त्यांनी योजली असावी, असा एक मतप्रवाह प्रचलित आहे. दुसऱ्याच्या तयार घरट्यात अंडी देणे किती सोपे; पण कावळ्याच्या घरट्यात कोकिळा अंडे देईपर्यंत ते कोणत्या प्रक्रियांमधून जातात हे पाहीले, तर स्वतःचे घरटे बांधणे सोपे वाटते. कोकीळ नर माच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गाऊ लागतो, ते ऑगस्ट मध्यापर्यंत त्याचा कंठशोष सुरू असतो. पहाटे ३पासून चालणारे गाणे दिवसातील निम्मा वेळ खाते. याशिवाय गावकावळ्याचे योग्य घरटे निवडणे, त्यांचे लक्ष नसताना त्यात अंडे देणे, हे जीवावर बेतू शकते. हरिपूर गावात आमचा जो अभ्यास प्रकल्प सुरू आहे, त्यात असे दिसते, की जिथे गावकावळे समूहाने घरटी करतात, म्हणजे एकाच झाडावर अथवा एखाद्या छोट्या परिसरात अनेक घरटी; तिथे कोकीळ आपली अंडी देवू शकत नाहीत. कारण, कोकीळेवर नजर ठेवायला अनेक डोळे असतात असे असावे. याउलट, जिथे कावळ्यांची घरटी विखुरलेल्या, एकएकट्या झाडावर एखादे घरटे असते, अशा घरट्यात हमखास कोकिळा अंडी देण्यात यशस्वी होते.म्हणून गावकावळे शक्यतो समूहांनी घरटी करतात का, अशी शंका येते. इतकेच नव्हे, तर माझ्या निरीक्षणात हरिपूर गावातील ग्रामपंचायत परिसरातील कावळ्याचे घरटे कोकिळा निवडते, असे दिसले. गेली जवळजवळ ३० वर्षे मी या परिसरात कावळा कोकीळ पिल्लांना भरविताना पहात आलो आहे. याही वर्षी याच परिसरात मी तीन कोकिळेच्या पिलांना गावकावळा भरविताना पहात आहे. एखाद्या कावळ्याच्या जोडीला कोकिळा हमखास फसवते, असे दिसते. इतकेच काय, ते पिढीजात चालत असावे. हरिपूरमधील संगमेश्वर मंदिरातील चिंचेच्या झाडावर दर वर्षी होणाऱ्या कावळ्यांच्या घरट्यात मी कोकिळेची पिले जन्मलेली पहात आलो आहे.

इथे मी मुद्दाम गावकावळा (House crow) म्हणतो. कारण, मी गेली ३० वर्षे सांगली परिसरात गावकावळ्याला कोकिळेची पिले वाढविताना पहात आहे. ज्या परिसरात कोकिळा गाते त्या परिसरात गावकावळा हमखास असणार ही काळ्या दगडावरची रेघ. कोकिळा आहे; पण गावकावळा नाही, हे अशक्यच! याउलट, गावकावळा आहे, मात्र कोकिळा नाही असे असू शकते. तसेच दुसरे सहजीवन म्हणजे, गावकावळा, गावचिमणी (House sparrow) आणि मनुष्यवस्ती. मानवाने भटके जीवन सोडून शेती करणे आणि त्यानिमित्ताने गाव वसवणे, ही तर अगदी अलीकडची घटना; म्हणजे फारतर गेल्या १२-१५हजार वर्षांतील. हे दोन पक्षी आज मनुष्य वस्तीशिवाय घरटी करताना दिसत नाहीत. कॅसलरॉक या ठिकाणी मी इ.स. २००० ते २००३ असा एक पक्षी अभ्यास प्रकल्प राबविला. त्या ४० भेटीत माझ्या नोंदीत कोकिळा आणि गावकावळा हे दोन पक्षी तिथे दिसत नाहीत, तर याचवेळी शेजारच्या तीनेघाट या गावात हे दोन्हीही पक्षी आढळतात. आता मात्र, हे दोन्ही पक्षी कॅसलरॉक या गावात दिसतात.

*****


## निसर्गसखा : अल्प परिचय



**निनाद आनंद अभंग**

Creative Director in Entertainment Field

या ऑक्टोबर अंकाच्या मुखपृष्ठावरील कलाकृती निनाद अभंग यांनी साकारली आहे. तसेच येत्या संमेलनाचा सुंदर लोगो बनविला. निनाद अभंग हे स्वतः उत्तम पक्षी अभ्यासक असून भारतातील लोकप्रिय ॲनिमेशन कार्टून सिरीज मोटू-पतलू, छोटा भीम, झोल-माल मध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग होता विदर्भात कार्यरत YCCS मधील लोगो डिझाईनच्या स्पर्धेमध्ये पहिल्या पुरस्काराचा मानकरी ठरले. अमरावती जिल्हयाच्या पक्षीसूचीमध्ये महत्वपूर्ण योगदान देत आहेत भारतातील सर्वात मोठ्या Sculpture (भंगारापासून निर्माण केलेली कलाकृती) घोडयाची निर्मिती केली मेळघाट मध्ये रानपिंगळा (Forest Owlet) संशोधक प्रकल्पावर काम. चंडोल प्रजातीवर आंतरराष्ट्रीय लघुपटाची निर्मीती तसेच विदर्भामधील तलावावरील पाणपक्षांचा विशेष अभ्यास याआधीही महाराष्ट्र पक्षीमित्रमध्ये आपल्या विविध कलाकृतीद्वारे त्यांनी आपले योगदान दिलेले आहे.



# रेतीच्या टाळांचा श्वास :
# बदलत्या थार वाळवंटातील एक अनुभवकथन



**डॉ. सुजित शिवाजी नरवडे**
उपसंचालक, बीएनएचएस

थार वाळवंट म्हणजे फक्त रेती नव्हे–ती माझी शाळा आहे, रंगमंच आहे, आणि मंदिरसुद्धा! मी जेव्हा पहिल्यांदा पोखरणच्या धोऱ्यांमध्ये पाऊल टाकलं, तेव्हा मनात एकच विचार होता–इथे काहीच नाही. पण काही आठवडे पुरेसे ठरले, आणि मग समजलं, की इथे 'काहीच नाही' म्हणजे 'सगळंच आहे.' एक सकाळ आठवते–दुर्बिणीतून पहाताना दूरवर एक नर माळढोक सूर्याच्या पहिल्या किरणांत न्हालेला दिसला. तो हळूहळू चालत होता, आणि माझं मनही त्याच्या मागे चालत होतं–त्या पक्ष्याच्या पावलांमधून थारच्या इतिहासात, संस्कृतीत आणि श्वासात!

माझं बालपण मसला खुर्द, तुळजापूर, धारशिव जिल्ह्यातल्या गवताळ कुरणांमध्ये गेलं. काळवीट, लांडगा, खोकड सहज दिसायचे. माळढोक कधीतरी! पण, लहानपणी वाचलेल्या पुस्तकांतून वाळवंटाची एक रहस्यमय प्रतिमा मनात रुजली होती–गावं रेताळ धोऱ्यांमध्ये हरवलेली, उंट म्हणजे वाळवंटातील जहाज, आणि जीवन म्हणजे संघर्ष! जेव्हा मी मारवाडच्या मातीत पाऊल ठेवलं, तेव्हा त्या कल्पनांचं संचित वास्तवात विरघळलं. २०१४मध्ये माझे पीएच.डी. मार्गदर्शक डॉ. असद रहमानी यांच्यासोबत मी थारमध्ये आलो. इथलं सौंदर्य दृश्यात्मक होतं, पण भावनात्मकही–रेताळ जमिनीतले वन्यजीव, स्थानिक लोक, आणि मिसळलेल्या संस्कृती यांचा एक उत्कट संगम!

थारच्या मातीमध्ये प्रत्येक थरात जीवन आहे. पावसाने हरीत झालेलं वाळवंट, ढगांच्या कवेत भरलेलं आकाश, आणि गवताच्या कुशीतून बाहेर पडणारे माळढोक–हे दृश्य म्हणजे निसर्गाच्या रंगमंचावरचा एक जिवंत नृत्याविष्कार! टोळांचे थवे उसळताना, वेडे राघू त्यांच्यावर उड्या घेताना, चिंकारा हरणं आनंदाने विचरण करताना, मरुस्थली कोल्हा विजेसारखा झपाट्याने सरकताना–हे सगळं मी डोळ्यांनी पाहिलं आहे. जमिनीवर, थारच्या मातीमध्ये अनेक सूक्ष्म घटक आपली भूमिका निभावत असतात-रेड व्हेल्वेट माइट्स, डंग बीटल्स, कॅमल स्पायडर्स..., हे सारे थारच्या जीवनचक्राचे गुप्त शिल्पकार आहेत.

माळढोक हा पक्षी केवळ संकटग्रस्त नाही, तर आपल्या गवताळ संस्कृतीचा, जैवविविधतेचा आणि सहजीवनाचा प्रतीक आहे. आज तो केवळ तीन ठिकाणी उरलेला आहे. पोखरण फिल्ड फायरिंग रेंजमध्ये त्याची सर्वात मोठी लोकसंख्या आहे. लष्करी क्षेत्रामुळे मानवी हस्तक्षेप कमी आहे, पण विजेच्या तारांमुळे मृत्यूचं सावट कायम आहे. डेझर्ट नॅशनल पार्कमध्ये पक्ष्यांची संख्या सतत बदलते. सीमावर्ती भागात काही पक्षी भारत–पाकिस्तान सीमारेषा ओलांडून फिरतात, पण त्यांचं संरक्षण हे एक आव्हान आहे. हे सगळं मी प्रत्यक्ष अनुभवलं आहे;मृत पक्ष्यांच्या पंखांवरून हात फिरवताना, त्यांच्या प्रजनन स्थळांवर एकटं उभं राहून विचार करताना!आज थारमध्ये सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प झपाट्याने वाढत आहेत. भारताच्या ५०० ऋथ नॉन–फॉसिल, अ–जीवाष्म ऊर्जा ध्येयासाठी थारला केंद्रबिंदू बनवण्यात आलं आहे. पण त्याचा पर्यावरणीय खर्च मोठा आहे. खेजडी वृक्ष तोडले जात आहेत, गोचर आणि ओरण जमीन ताब्यात घेतली जात आहे. पशुपालक विस्थापित होत आहेत. मला एक उंटवाला भेटला होता. त्याच्या उंटाच्या पाठीवर चारा नव्हता. आधी आम्ही चारा गोचर जमिनीतून मिळवायचो, तो म्हणाला, आता सौर प्रकल्प आले, आणि आम्हाला चारा विकत घ्यावा लागतो. या वाक्याने माझं मन हादरलं.



या सगळ्या पार्श्वभूमीवर माझं काम केवळ एका वैज्ञानिक अभ्यासाचेच नव्हे, तर एक सामाजिक आणि भावनिक संवादाचंही आहे. मी जेव्हा विश्नोई समाजाच्या बैठकीत एक वृद्ध महिलेला ऐकलं, खेजडी आमचं जीवन आहे. त्याच्या सावलीत आमचं भविष्य आहे.तेव्हा मला जाणवलं की संवर्धन हेकेवळ धोरण नव्हे;तर श्रद्धेची गोष्ट आहे. खेतोलाई, धोलिया आणि बीकानेर परिसरातील विश्नोई समाज हे संवर्धनाचे खरे शिलेदार आहेत. त्यांच्या घरांमध्ये वन्यजीवांच्या चित्रांसोबत संवर्धनाच्या गोष्टी सांगितल्या जातात, आणि मुलांना लहानपणापासून,'प्राणी वाचवा, वृक्ष वाचवा,' हे शिकवलं जातं. त्यांच्या सहभागामुळेच थारमध्ये एक लोकाभिमुख संवर्धनप्रतिमान (मॉडेल) उभं राहू शकलं आहे; जे लोकांच्या हृदयातून उगम पावलेलं आहे.अधिवास पुनर्स्थापनेच्या कामात आम्ही पोखरण फिल्ड फायरिंग रेंज आणि आसपासच्या सात गावांमध्ये सुमारे ११०० हेक्टर

क्षेत्रावरविलायती बाभुळ(झ्रौंीळिी क्षींश्रळषश्रीर)या परकीय आक्रमक झाडांचे निर्मूलन केले. त्याजागी स्थानिक गवतांची पुनर्स्थापना झाली. GIS आधारित संवेदनशीलता नकाशाच्या मदतीने आम्ही माळढोक पक्ष्यांच्या हालचाली, प्रजनन स्थळं, अन्नसाधनांची उपलब्धता आणि मानवी हस्तक्षेप यांचा अभ्यास केला. त्यातून प्रत्येक उपक्षेत्रासाठी विशिष्ट संरक्षण उपाय सुचवले गेले. या कामात मला बीएनएचएसच्या संचालक, अध्यक्ष आणि गव्हर्निंग बॉडीचा अमुल्य असा पाठिंबा लाभला आहे. त्यांनी माझ्या शिफारसींना धोरणात्मक मान्यता दिली, आणि थारसारख्या संवेदनशील भागात काम करण्यासाठी मला स्वातंत्र्य आणि विश्वास दिला. माझ्या अनुभवाला दिशा आणि विस्तार देणं हे संस्थेच्या नेतृत्वाचं मोठं योगदान आहे.या कामात नीलकंठ बोडा, सचिन विश्नोई आणि पंकज विश्नोई यांचा मोलाचा वाटा आहे. हे तिघं केवळ क्षेत्रीय सहाय्यक नाहीत, तर थारच्या मातीशी जोडलेले संवर्धनयोद्धे आहेत. आणि कमलेश विश्नोई-पोखरणचे असिस्टंट फॉरेस्टर-यांनी वन विभागाच्या अधिकृत भूमिकेच्या पलीकडे जाऊन माळढोक-संवर्धनासाठी अनेक महत्त्वाचे टप्पे सुलभ केले. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रशासन आणि समुदाय यांच्यातील दुरावा कमी झाला, आणि संवर्धनाच्या प्रयत्नांना स्थानिक आधार मिळाला.

या प्रवासात माझं कुटुंबही माझ्यासोबत आहे. मुंबईसारख्या शहरातून राजस्थानच्या दूरस्थ आणि कठीण वातावरणात स्थलांतर करणं हे कुणासाठीही सोपं नसतं. पण माझ्या पत्नीने, मुलांनी, आणि घरच्यांनी केवळ समजूतदारपणानेच नव्हे, तर पूर्ण समर्पणाने हा बदल स्वीकारला. आमचं घर म्हणजे आता एक संवर्धनकेंद्र आहे-जिथे चर्चा, योजना, आणि थारच्या मातीवरून आलेली रेतीही टेबलावर असते. संवर्धन ही माझी नोकरी नाही, तर ती आमच्या कुटुंबाची एक सामूहिक जबाबदारी आहे. आणि म्हणूनच, थारच्या श्वासाला जपणं हे आमचं एकत्रित ध्येय बनलं आहे.मी हे सगळं अनुभवातून सांगतो. मी पाहिलं आहे की एक छोटी कृती-जसं की एका शाळेत माळढोकावर आधारित नाटक-कसे संपूर्ण गावाचं मन बदलू शकते. मी अनुभवले आहे की एक पोस्टर, एक गोष्ट, एक संवाद-हे लोकांच्या मनात संवेदनशीलतेची पहिली ठिणगी पेटवू शकतात. जेव्हा एखाद्या मुलाने नाटकात माळढोक बनून 'माझं घर कुठे गेलं?'असा प्रश्न विचारला, तेव्हा प्रेक्षकांमध्ये शांतता पसरली होती. त्याक्षणी मला जाणवलं की संवर्धन ही केवळ शास्त्राची गोष्ट नाही, ती भावना जागवण्याची प्रक्रिया आहे.

माळढोक आणि तणमोर हे पक्षी केवळ संकटग्रस्त नाहीत, तर आपल्या गवताळ संस्कृतीचे आणि जैवविविधतेचे प्रतीक आहेत. पण, महाराष्ट्राने गेल्या दशकात हे दोन पक्षी जवळजवळ गमावले आहेत. नान्नज परिसरात माळढोक पूर्वी सहज दिसायचा.पण, आता तो केवळ आठवणीत उरला आहे. खरमोर तर अकोला, वाशीम, यवतमाळसारख्या जिल्ह्यांतून अदृश्य झाला आहे. २०१७ च्या राष्ट्रीय सर्वेक्षणात महाराष्ट्रात एकही ठिकाणी तो आढळला नाही. हे केवळ आकडे नव्हेत. ते माझ्या डोळ्यांनी पाहिलेलं वास्तव आहे. मी त्या रिकाम्या कुरणांमध्ये उभा राहून विचार करत होतो, की आपण काय गमावतो आहोत आणि काय जपायला हवं होतं.या घटनेमागे अनेक कारणं आहेत. गवताळ अधिवासाचा ऱ्हास, विजेच्या तारांशी होणारे अपघात, अतिक्रमण, अतिचराई, आणि परकीय वनस्पतींचा प्रसार! मी हे सगळं अनुभवातून सांगतो. मी पाहिलं आहे की एक छोटी कृती-जसं की एका शाळेत माळढोकावर आधारित नाटक-कसे संपूर्ण गावाचं मन बदलू शकते. मी अनुभवले आहे की एक पोस्टर, एक गोष्ट, एक संवाद-हे लोकांच्या मनात संवेदनशीलतेची पहिली ठिणगी पेटवू शकतात. जेव्हा एखाद्या मुलाने नाटकात माळढोक बनून 'माझं घर कुठे गेलं?' असा प्रश्न विचारला, तेव्हा प्रेक्षकांमध्ये शांतता पसरली होती. त्याक्षणी मला जाणवलं की संवर्धन ही केवळ शास्त्राची गोष्ट नाही, ती भावना जागवण्याची प्रक्रिया आहे.



महाराष्ट्रातील माझ्या पक्षीमित्रांना आणि गवताळ प्रदेशाशी जोडलेल्या सर्व सहकाऱ्यांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो. आपल्या राज्यातही असे अनेक कुरण आहेत, जे थारसारखेच संवेदनशील आणि जैवविविधतेने समृद्ध आहेत. मसला खुर्दसारख्या गावांमध्ये माळढोक, काळवीट, लांडगा, खोकड यांसारखे प्राणी आजही दिसतात, पण त्यांच्या अधिवासावर संकटं वाढत आहेत. गवताळ प्रदेश म्हणजे केवळ रिकामी जमीन नव्हे, ती आपल्या संस्कृतीची, अन्नसाखळीची आणि पर्यावरणीय समतोलाची मूलभूत रचना आहे. आपण, आज जर ती जपली नाहीत, तर उद्या ती केवळ आठवणीतच उरतील.म्हणून मी तुम्हाला आवाहन करतो, गवताळ प्रदेश वाचवा. स्थानिक लोकांशी संवाद साधा, शाळांमध्ये गोष्टी सांगा, पोस्टर तयार करा, नाट्यरूपांतर करा. प्रत्येक कृती महत्त्वाची आहे. महाराष्ट्राच्या माळरानांमध्येही तणमोर आणि माळढोकचं अस्तित्व टिकवण्यासाठी आपली भूमिका निर्णायक ठरू शकते. चला, एकत्र येऊन पक्षिसंवर्धनाची एक सर्वसमावेशक, लोकाभिमुख आणि विज्ञानाधारित चळवळ उभी करू या;जिथे भावना, श्रद्धा आणि कृती यांचा संगम होतो. हे आपलं उत्तरदायित्व आहे, आणि हीच आपली खरी ओळख!

# माझ्यासाठी आणि मला वाटतं



**शशांक नगराळे**
पक्षी संशोधक
भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून

माझ्यासाठी, आणि मला वाटते आपल्यापैकी बहुतेकांसाठी, वन्यजीव किंवा विशेषतः पक्ष्यांबद्दलची आवड, ही त्यांच्याविषयीच्या एका नैसर्गिक ओढीतून सुरू होते. ही ओढ काळानुसार अनेक पटींनी वाढत जाते.जसजसे आपण मोठे होतो, वाचतो, नवीन गोष्टी शोधतो तसतसे, आयुष्य आपल्याला घडवते. किंवा हे मानवालात्याच्या सभोवतालच्या पर्यावरणाला समजून घेण्याच्या नैसर्गिक जिज्ञासेमुळेही असू शकते. पण, आयुष्य पुढे जात असताना, आपल्यापैकी काही जण सामाजिक जबाबदाऱ्यांमध्ये (संसारात) अडकून पडतात आणि वेळेअभावी त्यांना या वन्यजीव सृष्टीला शोधण्याची संधी मिळत नाही. तर, आपल्यापैकी काहीजण यासारखे लेख वाचायला वेळ काढतात किंवा नशीबवान असतात की त्यांना नैसर्गिक अधिवासांमध्ये फिरायला मिळते. तरीही, काहीतरी नवीन शोधण्याची आणि समजून घेण्याची इच्छा आपल्या मनात खोलवर टिकून रहाते. म्हणूनमला आशा आहे, की हे लिखाण तुम्हाला (आपल्याला) आपल्या पर्यावरणाला समजून घेण्यास, अधिक प्रयत्न करण्यास प्रवृत्त किंवा प्रोत्साहित करेल, आणि तेही आपल्या सर्वोत्तम आणि सहजसोप्या मित्रांकडून – म्हणजेच पक्ष्यांकडून!

लहानपणी मी अमरावती शहरात वाढलो आणि आपल्यापैकी अनेकांप्रमाणेच माझ्या मनातही पक्ष्यांबद्दल तीच आपुलकी आणि उत्साह होता. किशोरवयात मी पक्षी पहाण्यासाठी माझ्या शहराच्या आसपासच्या तलावांना भेट देऊ लागलो. एका स्वस्त द्विनेत्रीने मी पक्षी मोजायचो, आणि आलेली संख्या ४ने भागावी लागायची, कारण तिची प्रिझमसिस्टीम तुटलेली होती, हे मला नंतर कळले. जोपर्यंत माझ्याकडे एक पॉइंट–अँड–शूटकॅमेरा आला नाही, तोपर्यंत हे भागाकार सुरूच होते. पण कॅमेऱ्यामुळे मला पक्ष्यांचे एक संपूर्ण नवीन जग दिसले. झूमच्या मदतीने मी माझ्या आवडत्या 'छत्री तलावा'वर पक्ष्यांना अगदी जवळून पाहू शकत होतो. पण एकाएकी, मी, सुरय (Terns), टिटवी (Lapwings), चिखल्या (Plovers),आणि या तलावाला आपलं घर मानणाऱ्या अनेक प्रजातींच्या घरट्यांवरून ट्रक आणि रोलर्स चालताना पाहिले. कारण म्हणजे, तलावाचे तथाकथितसुशोभीकरण! हिवाळ्यात 'मोठी लालसरी' (Red-crested Pochard), तरंग बदक (Eurasian Wigeon) आणि छोटी लालसरी(Common Pochard),यांची संख्या इतकी वाढायची की संपूर्ण तलाव लाल दिसायचा. पण, आता तो तलाव ओसाड पडलेला असतो. हाच माझ्यासाठी संवर्धन आणि संशोधनाकडे वळण्याचा एक निर्णायक क्षण होता, असे मला वाटते. या प्रकरणात, मी एक ११वीचा विद्यार्थी असल्याने, कृती करण्यासाठी खूप उशीर झाला होता. मला आशा आहे की तुम्हीही असेच काहीतरी अनुभवले असेल आणि त्यावर काहीतरी कृती केली असेल. याच वेळी मी संवर्धन–केंद्रित संशोधनात करिअर करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र 'पक्षिमित्र'सारख्या चळवळीत सामील झालो, जिथे मी पहिल्यांदा घरट्यांच्या नष्ट होण्याचा, हा मुद्दा मांडला आणि झालेल्या नुकसानीची किमानपक्षीनोंद करण्याची आणि त्याची मुख्य कारणे शोधण्याची मला संधी मिळाली.




'महाराष्ट्र पक्षिमित्र' आणि 'वाइल्डलाइफ अँड एन्व्हायरनमेंट कॉन्झर्वेशन सोसायटी, अमरावती'यांच्यासोबत मला पक्ष्यांचे निरीक्षण कसे करावे, आणि त्यांची पद्धतशीर नोंद कशी ठेवावी, याचे मार्गदर्शन मिळाले, ज्यातून पुढे एक सर्वसमावेशक सूची तयार झाली. या प्रकल्पांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम केल्याने, पक्ष्यांना अधिक जवळून समजण्यास त्याची मला मदत झाली.याचा एक उत्तम परिणाम म्हणजे दोन कमी परिचित अभयारण्ये – ज्ञानगंगा आणि पैनगंगा – यांच्यासाठी पद्धतशीर सूची तयार झाल्या. या सुरुवातीच्या टप्प्यात डॉ. जयंत वडतकर आणि डॉ. गजानन वाघ यांसारख्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या मनात प्रश्नांची लहर निर्माण झाली.हे प्रश्न संवर्धनाच्या दृष्टिकोनातून संवेदनशील होते. या प्रश्नांनी माझी या क्षेत्रातील आवड टिकवून ठेवली आणि हे काम माझ्यासाठी आनंददायक झाले.

ठाम पाठिंबा आणि मार्गदर्शनामुळे मला 'भारतीय वन्यजीव संस्थान' (Wildlife Institute of India) मध्ये पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेण्यास मदत झाली. आणि यासंस्थेने मला समस्यांकडे ठोस वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणारा एक नवोदित संशोधक म्हणून घडविले.

संशोधनात वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धती आणि साधने शिकत असताना, माझ्या प्रश्नांची कक्षा खूप विस्तारली. प्रजातींची केवळ यादी करणे हेच एक कार्य आहे, हा विचार माझ्यासाठी एक पायाभूत टप्पा आहे, असे वाटले. मी या प्रजातींच्या सूचीच्या पलीकडे जाऊन पारिस्थितिकी (ecology) बद्दल अधिक विचार करू लागलो होतो. भारतीय वन्यजीव संस्थेत असताना, मला डॉ. तुषार परब यांच्या मार्गदर्शनाखाली काही शोधनिबंधांचा सह-लेखक होण्याची संधी मिळाली. ही संधीपक्षिनिरीक्षण आणि पक्षिसंवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, अशी मला आशा आहे. या शोधनिबंधांपैकी एक,'झीटाडायव्हर्सिटी' (zeta diversity) आणि त्याच्या विश्लेषणावर होता, ज्यामुळे युरेशियनवॉर्बलर्स (Eurasian warblers) या पक्ष्यांचे सह-अस्तित्व आणि त्यांच्या अधिवासाच्या गरजा समजण्यास मदत झाली. दुसरा शोधनिबंध अधिक मनोरंजक होता, जो बहुतांश पक्षीनिरीक्षक वापरतात; जसे 'ई-बर्ड'मधले फोटो आयडेंटिफिकेशनटूल ! परंतु, बहुतांशी एकसारख्या दिसणाऱ्या (cryptic species) वॉर्बलर्ससारख्या पक्ष्यांमध्ये, ई-बर्डचे हे मॉडेल फारसे चांगले काम करत नसल्यानेएक नवीन मॉडेल विकसित करण्याची गरज भासली, आणि विशेषतः याच मर्यादित प्रजातींसाठी निर्माण केलेल्याआमच्या मॉडेलने या प्रजाती ओळखण्यात मोठी अचूकता दर्शवली.

आम्ही ज्या एका मोठ्या भौगोलिक क्षेत्रावरील डेटाचे विश्लेषण केले, त्यामुळे आम्हाला 'प्रजाती-विशिष्ट' अधिवासाच्या गरजा आणि त्यांची सहनशीलता निश्चित करण्यास मदत झाली. या डेटासेटचा मागोवा घेताना, मला आठवले की मी स्वतः कधी तलावावर, जंगलात किंवा शहराच्या मध्यभागी पक्षी शोधत होतो, 'ई-बर्ड'वर सूची अपलोड करून विज्ञानाला मदत करत होतो आणि संपूर्ण परिसंस्थेबद्दलची आपली समज तपासून सुधारत होतो. या दोन



शोधनिबंधांनंतर, मला कळले की पक्षिनिरीक्षक किंवा पक्षिमित्र म्हणून आपण किती महत्त्वाचे आहोत. आपल्यापैकी प्रत्येकाने एखाद्या ठिकाणी जाऊन पक्ष्यांची नोंद करणे हे एक छोटेसे योगदानही खूप महत्त्वपूर्ण ठरते,आणि म्हणून, मी प्रत्येक वाचकाला आपल्या सभोवतालचे जग आणि विशेषतः आपल्या लाडक्या पक्ष्यांना शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो.

आज पक्षिसंशोधन हे केवळ त्यांचे वितरणक्षेत्र, अधिवास आणि संख्येच्या अभ्यासापुरते मर्यादित राहिलेले नाही.तर ते, गाण्यांवर किंवा ध्वनीशास्त्रावर (acoustics) आधारित वर्तणूक, घरटी बांधणे, जीवन-इतिहास, उत्क्रांती आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये विस्तारले आहे. यांपैकी काही बाबी ह्या समर्पित वैज्ञानिकसंशोधनातून येतात, तर काही बाबी, आपल्यासारख्या पक्षिनिरीक्षकांनी गोळा केलेल्या डेटामधून;जसे की, त्यांनी पाहिलेले पक्षी, त्यांचे आवाज किंवा इतर निरीक्षणे! म्हणून, आपल्यातील जिज्ञासू पक्षिनिरीक्षकाला जिवंत ठेवणे खूप महत्त्वाचे ठरते; जेणेकरून आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पक्षिविज्ञानात योगदान देत राहू.

*****



# पक्षी आणि वटवृक्ष - सहजीवन



**डॉ. चेतना उगले**
पक्षी अभ्यासक
सहाय्यक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय,कळंब

निसर्गातील प्रत्येक जीव झाडांसोबत जुळलेला आहे: अन्नासाठी, निवाऱ्यासाठी किंवा संरक्षणासाठी! हा संबंध फक्त एकतर्फी नाही, तर अन्नासाठी स्वावलंबन प्राप्त वृक्ष परागीकरण आणि बीजप्रसार अश्या जीवनावश्यक प्रक्रियांसाठी इतरांवर अवलंबून आहे. हे परस्परावलंबन एवढे अटळ आहे, की त्यांचे अस्तित्वच एकमेकांवर टिकून आहे. अन्नाची विशिष्ट निवड प्राण्यांना नेमक्या वृक्षापर्यंत घेऊन येते आणि फुलातील रस ग्रहण करतेवेळी किंवा फळांवर आपली भूक भागवितेवेळी नकळत परागकण अथवा बीजांचा प्रसार होतो. परिणामतः परिसंस्थांचे चक्र तयार होते. अश्या प्रजाती एकमेकांसाठी, किंबहुना एकमेकांसोबत उत्क्रांत होतात. डार्विनने त्याच्या उत्क्रांतीच्या सिद्धांतामध्ये अशाच एका उदाहरणामधून हे सिद्ध केले, गॅलापॅगॉस बेटांवर डार्विनने फिन्च पक्ष्यांचा अभ्यास केला. अभ्यासामध्ये त्याला पक्ष्यांच्या चोचीमध्ये विविधता आढळली; पुढे आणखी निरीक्षणांती आढळले की अन्नाच्या निवडीनुसार हा बदल आहे. बिया फोडण्यासाठी जाड आणि मजबूत चोच तर फुलांतील मकरंद पिण्यासाठी अणकुचीदार वाकलेली चोच, आणि किडे पकडण्यासाठी लांब पण बारीक चोच. अन्नासाठी त्यांच्या चोचीमध्ये झालेला बदल हा वनस्पती प्रजातीसाठी मोलाचा ठरला. अशा पक्ष्यांद्वारे परागीकरण आणि बीजप्रसार होणे शक्य झाले. पुढे जाऊन अनुवांशिकतेने बदल झालेले गुण वारसा म्हणून पुढल्या पिढीकडे गेले. पृथ्वीवरील सजीवांचा विकास हा आजूबाजूच्या बदलांशी जुळवून घेत होणाऱ्या बदलांमुळे झाला.

आपल्या परिसरातील वृक्षांचे निरीक्षण केले तर लक्षात येईल, बऱ्याच प्रजाती एकमेकांवर अवलंबून आहेत. किंबहुना, काही वृक्ष असे आहेत, ज्यांच्या अस्तित्वामुळे संपूर्ण परिसंस्था टिकून आहे. त्यांना कीस्टोन प्रजाती (keystone species) म्हणतात. त्यांच्या संख्येच्या तुलनेत परिसंस्थेवर मोठा परिणाम पडतो. वटवृक्ष आणि फायकस प्रजातीतील प्रमुख वृक्ष हे अशीच भूमिका बजावतात. त्यामध्ये प्रामुख्याने वटवृक्षाचा उल्लेख करता येईल. वटवृक्ष केवळ जंगलामध्ये नाही तर इतर परिसंस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. पक्ष्यांसाठी आश्रयस्थान आणि अन्नाचा स्रोत; माकड, वटवाघुळ यांच्यासाठी अन्नाचा पुरवठा आणि झाडाखाली वावरणाऱ्या किडे, किटक, छोटे प्राणी, पक्षी यांसाठी आश्रयस्थान. खाली पडलेल्या फळांमुळे तयार होणाऱ्या सेंद्रिय खतामुळे जमिनीची सुपीकता वाढते. वटवृक्ष आणि पक्ष्यांचा अविभाज्य संबंध आहे. बीजप्रसारासाठी पक्षी महत्त्वाची भूमिका बजावतात. विस्तीर्ण दिसणाऱ्या वटवृक्षाच्या फांद्या चहुबाजूंनी पसरतात. या फांद्यांमधून जाड, मजबूत अशी 'प्रॉप रूट' म्हणजे 'स्तंभ-मुळे' लटकतात. फांद्या आणि खोडामधून उगविलेली मूळे जसजशी मोठी होतात तसतशी मजबूत होत गुरुत्वाकर्षणाच्या दिशेने जमिनीकडे जातात. पसरलेल्या फांद्यांना जास्तीचा आधार देणारी ही मुळे काही दशकांनी खोडासारखी मजबूत होतात. फांद्यांचा पसारा परीघ काही मीटरपासून काही हेक्टर्सपर्यंत वाढू शकतो. जगातील सर्वात मोठा वटवृक्ष भारतात कोलकाता येथील आचार्य जगदीशचंद्र बोस भारतीय वनस्पति उद्यानात आहे; जे जवळजवळ १.८ हेक्टरमध्ये पसरलेले आहे आणि अनेक स्तंभमुळांमुळे एखाद्या वनाचा भास निर्माण करते. स्तंभमुळे पसरलेल्या फांद्यांना आधार तर देतातच पण सोबत जमिनीमधून जीवनाश्यक घटक शोषून झाडाला वाढण्यास मदत करतात. अशा वनसदृश झाडाखाली प्राणी, पक्षी आणि किटक सर्वांना सावली आणि संरक्षण, दोन्ही मिळते; आणि मानवाला सुद्धा! राम आणि सीतेच्या वनवासातील प्रवासात त्यांना वटवृक्षाची छाया आणि संरक्षण मिळाले, असा उल्लेख आहे. फक्त रामायण नाही; तर पौराणिक कथांपासून भारतीय संस्कृतीपर्यंत सर्वांमध्ये वटवृक्षाला अनन्य साधारण महत्त्व आहे. वटपौर्णिमा या सणामध्ये वटवृक्षाची पूजा केली जाते. विष्णूचा अवतार मानल्या गेलेल्या वटवृक्षाला जीवनाचा आधार मानला जातो. या उदाहरणांवरून वनस्पतीला देवत्व देऊन त्यांच्या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते. वटवृक्ष प्रत्येक जीवाला अन्न देतो. वडाच्या आणि इतर फायकस (Fig) फळांमध्ये आणि बियांमध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, तंतू आणि कॅल्शिअमकॅनसिम, मॅग्नेशिअम, लोह, यांसारखी खनिजे असतात; जी प्राण्यांना ऊर्जा देतात. त्यांना वाढ आणि प्रजननासाठी शारिरीकदृष्ट्या तयार करतात.



फळांमध्ये असलेल्या व्हिटॅमिन्स व अंथोसायनिन आणि पॉलीफेनोल्स यांसारखे अँटीऑक्सिडंट्स पक्ष्यांच्या स्नायूला तणावमुक्त ठेवतात. म्हणूनच असे म्हटले जाते की, वटवृक्षाच्या छत्रछायेखाली राहणारा प्राणी सुखी आणि आरोग्यसंपन्न होतो.

मात्र, एखाद्या फळासारखे भासणारे वटवृक्षाचे फळ, हे फळ नाही तर अनेक फळे एकत्रित येऊन बनलेले एक अनोखे मल्टिपल फळ आहे. शास्त्रीय भाषेमध्ये सायकॉनिअम (डूलेपळीी) असे म्हणतात. हा एक पुष्पबंधाचा प्रकार आहे. आपल्याला दिसणारे, बंद असणारे हे फळ आतमध्ये अनेक लहान-लहान फुलांनी व्यापलेले आहे. आतमध्ये कपासारख्या तयार झालेल्या भागावर पुष्परुपी स्त्रीकेसर आणि पुंकेसर असतात. असा फुलांचा समुदाय फळाच्या आतील बाजूस असतो आणि बाहेरून त्याला एक छोटे छिद्र असते; ज्यामधून परागण करणारे किडे मुख्यतः फिग-फ्लाय किंवा वारप आत येतात. हे किटक एका फुलावरून दुसऱ्या फुलावर जातात; तेव्हा पराग यांच्या शरीरावर आणि पंखावर चिकटतात. बाहेर पडताना दुसऱ्या सायकॉनिअममध्ये प्रवेश करतात आणि तिथे चिकटलेले परागकण फुलांवर ठेवतात आणि परागसिंचन होते. त्यामुळे हे किडे वटवृक्षासाठी महत्त्वाचे आहे पण सोबतच वास्पच्या जीवनचक्रासाठीही झाडाचे तेवढेच महत्त्व आहे. वटवृक्षाच्या फळांमध्ये फिग फ्लाय आणि फिग वास्प अंडी घालतात त्यामुळे दोघेही एकमेकावर निर्भर आहे. एक प्रकारे नैसर्गिक सहजीवनच. ह्या परागसिंचनामुळे स्त्रीफुलांमध्ये बिया तयार होतात. बाहेरून जाड आणि मऊ असणारे सायकॉनिअम आतमधून गर आणि बियांनी भरलेले असतात. हे फळ चवीला गोड, रसाळ आणि आकाराने लहान असल्याकारणाने विविध पक्षी आणि छोटे सस्तन प्राणी सहजपणे खातात. पक्षी जेव्हा वटवृक्षाचे फळ खातात तेव्हा नकळतपणे असंख्य बियाही पोटात टाकतात. या फळांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असल्याने पचायला सहज सोपे असतात, परंतु त्यातील बिया छोट्या आणि तंतूयुक्त असल्याकारणाने त्यावर पोटातील पचनद्रव्यांचा फारसा परिणाम होत नाही, आणि त्या सुरक्षित राहून पक्ष्यांच्या विष्टेसोबत बाहेर टाकल्या जातात. झाडांवर, दऱ्याखोऱ्यात, कपारीत, झाडांच्या फांद्यांवर, उंच इमारती किंवा भिंतीच्या कपारींवर विष्टा करतात आणि पुढे अनुकूल वातावरणात त्या बिया रुजतात. जुन्या भिंतीवर किंवा कुठल्या झाडाच्या फांदीवर, पिंपळ वा वडाची झाडे सहज बघायला मिळतात. फळे खाणाऱ्या प्राण्यांच्या तुलनेने पक्षी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करतात. परिणामी, बीजप्रसाराच्या प्रक्रियेला वेग मिळतो. अशा बिया पाणी, गवत किंवा मातीमधील जैविक द्रव्यात मिसळतात आणि बीज अंकुरित होतात. पक्ष्यांमुळे होणारा बीज प्रसार हा वृक्षासाठी, नवीन झाडे तयार होण्यास फायदेशीर आहे. पक्ष्यांसोबतच माकडे, किटक, वटवाघुळे आदी प्राणी आणि वटवृक्ष, हे सहजीवन जगतात. पक्ष्यांच्या आहारात प्रामुख्याने किडे, मासे, किटक, फळे, बिया आणि इतर छोटे प्राणी यांचा समावेश होतो. त्यांच्या पोषणाच्या वेगवेगळ्या गरजा त्यांच्या आहारातून पूर्ण होतात. प्रथिने, व्हिटॅमिन्स, खनिजे आणि इतर जीवनसत्व यांच्या पूर्ततेसाठी पक्ष्यांचा आहार मिश्र आणि विविध प्रकारचा असतो. यासाठी त्यांना अन्नाचा सतत शोध घ्यावा लागतो. याउलट वटवृक्षाच्या फक्त फळांमध्येच प्रथिने, व्हिटॅमिन्स, खनिजे, इतर जीवनसत्वे आणि अँटीऑक्सिडंट्स भरभरून असतात. त्यामुळे अन्नाचा शोध या झाडाजवळ येऊन थांबतो. मिश्रआहार घेणाऱ्या पक्ष्यांपासून ते फक्त फळे खाणारे पक्षी, असे सर्व वटवृक्षावर बघायला मिळतात. पक्ष्यांचा मुक्त संचार आणि एकाच जागेवर जमाव यामुळे शिकारीपक्षीसुद्धा झाडाच्या उंच फांदीवर शिकारीसाठी येतो. मिश्रआहार असलेले पक्षी वडाच्या फळांसोबत फुलांच्या आतमधील किटक, फिग-फ्लॅय, वास्प खातात. सायकॉनिअममधील जेव्हा किटकांची संख्या आणि अंडी वाढतात, तेव्हा हे पक्षी आपल्या चोचीने फळ फोडून त्यातील किटकांवर आणि अंड्यांवर ताव मारतात. मैना, मोठी मैना, कबुतर, सातभाई, कोतवाल, सुतारपक्षी, कावळा, टोपीवाला असे मिश्रहारी पक्षी (ओम्निवोर्स), आपल्या टोकदार चोचींनी फळांमध्ये छेद करून आतील गाभा आणि त्यातील किटक अलगद काढून खातात. याउलट फळाहारी पक्षी (फुगिवोर्स), त्यांच्या विशेष चोचीने फळाचे छोटे-छोटे तुकडे करूत खातात. बुलबुल, तांबट, हरोळी, कोकीळ, पोपट, भांगपाडी मैना, धनेश, चष्मेवाला असे, प्रामुख्याने फळे खाणारे पक्षी वडाच्या झाडावर



अन्नाच्या शोधात सहज दिसून येतात. आणि अन्नाच्या शोधात आलेल्या पक्ष्यांनाच अन्न बनविण्यासाठी शिकारीपक्षी जसे की, सर्पगरुड, बुटेडगरुड, घार, पिंगळा, हे आढळून येतात. शिकारीपक्षी थेट फळे खात नाहीत. पण, फळे खायला येणाऱ्या पक्ष्यांची शिकार करतात. त्यामुळे, तेही झाडाभोवती रहातात. स्थानीय पक्ष्यांसोबत स्थलांतरित पक्षीदेखील वटवृक्षावर दिसून येतात. पळसमेना, विविध माशीमार, वटवट्या,

पर्णवटवट्या, पांढऱ्या-कंठाचा वटवट्या, जाड-चोचीचा फुलटोचा, छोटा अंगार, काळा थिरथिरा, असे स्थलांतरित पक्षीदेखील आकर्षित होतात. याला कारण म्हणजे, वटवृक्षाच्या फळांची उपलब्धता, जी साधारण सहा-सात महिने असते. उन्हाळ्याच्या सुमारास एप्रिल ते जुलै आणि हिवाळ्याच्या सुमारास ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये फलधारणा होते. ग्रीष्म ऋतूमध्ये जेव्हा झाडांची पानगळ चालू असते आणि अन्नाचा तुटवडा असतो नेमक्या त्या वेळी वटवृक्षाला फळ येतात आणि वटवृक्ष पक्ष्यांसाठी जणू अमृतकलश बनतो. वर्षातील दोन प्रमुख हंगाम सोडले तर काही प्रजातींमध्ये हवामान आणि वातावरणीय फरकामुळे वर्षभर थोड्या प्रमाणात फळे दिसून येतात. त्यामुळे स्थानीक पक्ष्यांसोबत स्थलांतरित पक्षीदेखील वटवृक्षाकडे आकर्षित होतो.पक्ष्यांना जेवढी गरज अन्न म्हणून फळांची आहे; किंबहुना तेवढीच गरज झाडांना पक्ष्यांची आहे, त्यांच्या बीज प्रसारासाठी! त्यामुळे, पिकलेली फळे बीजप्रसरकांना आकर्षित होण्यासाठी संकेत देतात. हे संकेत, दृश्यस्वरुपात (visuals) किंवा घ्राणेद्रीयांमार्फत (sensory) असतात. वटवृक्षाची गुच्छांमध्ये असलेली चटकदार लाल रंगाची फळे ठळकपणे दिसून येतात. उंबर आणि अंजीर यांसारख्या प्रजातींमध्ये पिकलेली फळे लगेचच गळून पडतात, अशी अस्थिर फळे जमिनीवर सांडलेली दिसतात. याउलट वडाची फळे पिकायला बराच कालावधी घेतात; गुच्छातील सर्व फळे एका वेळी पिकत नाहीत आणि पिकल्यावर बराच वेळ झाडाशी जोडलेली रहातात. एका संशोधनानुसार घ्राणेंद्रीयाच्या संकेताने पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी वडाचे झाड एका विशिष्ट प्रकारचे रसायन तयारकरते. इस्टर आणि फॅटी ॲसिड डेरीवेटीव्हजच्या रसायनांमुळे दिवसा आणि रात्री वेगवेगळे प्राणी आकर्षित होतात. 'बेन्झल्डिहाइड' सारख्या रसायनांमुळे रात्री वटवाघळे तर दिवसा 'सेस्कीटर्पेन' मुळे पक्षी आकर्षित होतात. फळांद्वारे निर्माण होणारे हे संकेत बीज प्रसारकांना बीज प्रसारासाठी आकर्षित करतात.

गोड असणारी वटवृक्षाची ही फळे अन्न तुटवड्यावेळी आणि विणीच्या हंगामात पक्ष्यांना शक्ती देतात. साखरेचे प्रमाण जास्त असल्याकारणाने हे फळ शक्तीसाठी प्रमुख स्रोत बनते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे धनेश, उन्हाळ्याच्या सुमारास फलधारणा होणारा हा वटवृक्ष धनेशाच्या विणीच्या हंगामात फळावर येतो. कोरड्या आणि उष्ण वातावरणात जेव्हा जंगलातील झाडांना फळे नसतात त्यावेळी धनेशाला प्रमुख खाद्य हे वटवृक्षाचे फळच असते. तसे हे फळ धनेशाचे आवडीचे देखील आहे. पश्चिम घाटामध्ये आढळणारे भारतीय कवडा धनेश आणि मोठा धनेश, हे प्रामुख्याने वडाच्या फळांवर निर्भर असतात. शास्त्रीय अभ्यासांमध्ये धनेशचा विणीचा हंगाम आणि वडाच्या झाडांची फळे आणि त्यानंतर धनेशाच्या विष्ठेतून होणारा वड आणि फायकस प्रजातींचा बीजप्रसार, याया एकमेकांशी संबंध आहे. त्यामुळे जंगलातील धनेशाचे आणि वडांच्या झाडाचे अस्तित्व एकमेकांवर अवलंबून आहे. संकटग्रस्त धनेशाचे संरक्षण होण्यासाठी अश्या प्रमुख संसाधन (ज्ञशू ीशीेीलश) असणाऱ्या वटवृक्षासारख्या प्रजातींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. पक्षी आणि वटवृक्ष यांचा घनिष्ट संबंध असताना दोन्ही प्रजाती एकमेकांवर अवलंबून असल्याकारणाने निसर्गातील समतोल राखण्यासाठी या प्रजातींचे संरक्षण आणि संवर्धन करणे गरजेचे आहे.



## स्वागत नवीन सभासदांचे

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १६४७ | राजस्थान | श्री. कैलाशचंद्र शर्मा | 9950332542 | kailashsharma54227@gmail.com |
| १६४८ | मलकापूर | श्री. जितेंद्र अण्णाजी नेवे | 9822861184 | janeve78@gmail.com |
| १६४९ | तरोडा बु. नांदेड | श्री. प्रमोद निवृत्तीराव वाठोरे | 9823470746 | pnwathore@gmail.com |
| १६५० | अहमदनगर | श्री. ज्ञानेश्वर महादेव वैद्य | 7588592057 | vaidyadnyaneshware@gmail.com |
| १६५१ | जुन्नर | श्री. दिपक दत्तात्रय भोर | 7972827384 | dipakbhor@gmail.com |

छायाचित्राची गोष्ट...

# काळा करकोचा



**मनोज बिंड**
पक्षी अभ्यासक व
वन्यजीव छायाचित्रकार
अमरावती

हा काळा करकोचा अगदीच काळा नसतो. त्याच्या गडद रंगांमध्ये अनेक छटा असतात हे पहिल्यांदा कळले तेंव्हाच विचार केला होता की त्याला,त्याच्या छटांसह छायाचित्रित करायचे. हे साधायला पुरेसा सूर्यप्रकाश असलेल्या दिवसाची निवड करणे आवश्यक होते. हा पक्षी अमरावती भागात स्थानिक स्थलांतर करून येतो. त्यामुळे ठराविक काळातच त्याचे दिसणे आणि त्याला टिपणे शक्य होते. त्याचबरोबर सूर्यप्रकाशसुद्धा मनासारखा असणे या गोष्टी योगायोगाचा भाग असतील याची खुणगाठ मनाशी बांधली होती. त्यानुसार,अनेकवेळा प्रयत्न करून या पक्ष्यांचे फोटो काढून झाले. पण, मनात असलेल्या आदर्शवत स्थितीची गाठ, काही केल्या पडत नव्हती. मात्र, २०२२ च्या मे महिन्याची ती संध्याकाळ खास कृपावंत झाली. अमरावतीमधील सावंगा, मालखेड तलावावर विविध टिलवा पक्षी आणि राजहंसाचा छोटा थवा अगदी निवांत खाद्य टिपत फिरत होता. आणि दूरवर-समोरच्या काठावर-उंच चार काळे ठिपके पाण्यात भक्ष्य शोधत होते. ते काळे ठिपके काळया करकोच्याचेच होते, हे जरा वेळाने लक्षात आले. मात्र, मनासारखे फोटो टिपायचे म्हटले तर हे अंतर खूप जास्त होते. फार आशा लावून बसण्याला अर्थ नव्हता. त्यामुळे, आहे तिथे जमिनीवर लोळण घेऊन राजहंसाच्या विविध हालचाली कॅमेराबद्ध करणे सुरू केले. आपण निपचित पडल्यावर पक्ष्यांचा धीर चेपतो आणि ते अधिक निर्भयपणे आजुबाजूला विचरण करतात, हे सूत्र धरून छायाचित्रण सुरू होते. बराच वेळाने तलावातील मासेमारी करणारी छोटी होडी दूरवरच्या काठावर पोहोचल्यामुळे अचानक ते चार करकोचे माझ्या बाजूच्या काठावर अलगद येऊन बसले. मी कॅमेरा तिकडे फिरवला आणि पहिला फोटो टिपला, तेव्हा लक्षात आले की इतकी वर्षे वाट पाहिली ती संधी हीच आहे. पक्ष्यांवर सायंकाळी पश्चिमेकडून योग्य कोनातून प्रकाश पडत होता. आता आवश्यकता होती, ती योग्य एक्सपोजरची! काळया रंगातील छटा सहजपणे खुलून येत नाहीत. त्यामुळे, किंचित ओव्हर एक्सपोज करण्याच्या दृष्टीने कॅमेरामॅन्युअलमोडवर टाकला. तेवढ्यात पक्षी इकडे तिकडे हालचाल करू लागले. दोनच्या गटात फिरू लागले. परिणामी,त्यांपैकी एका गटावर फोकस कायम ठेवायचा निर्णय घेतला. यामध्येही हालचाल झाल्यास स्थिर क्षण मिळण्यासाठी पुरेशी शटरस्पीड मिळावी, याकरीता १/८०० ची निवड केली. यापद्धतीने एक दोन फोटो काढले ते समाधानकारक आले. उत्साह वाढला. एवढ्यात तिसरा पक्षी या दोघांच्या समोरून गेला आणि तीन पक्ष्यांची एकत्रित फ्रेम अधिक आकर्षक दिसेल असे संकेत मेंदूने दिले. पुन्हा फोटो काढला. सहसा मी ५.६ ते ७.१ असे अपर्चर वापरतो. पण, मागील दोन पक्षी आणि पुढील पक्षी यांच्या दृश्यप्रतलात दोन ते तीन फुटांचे अंतर असल्याने एकतर पुढचा किंवा मागचे दोन पक्षी,यांपैकी एकच प्रतल शार्प टिपले जात होते. यावर उपाय म्हणजे, अपर्चर व्हॅल्यू वाढविणे. आता आली का पंचाईत! कारण, एव्हाना सूर्य मावळतीकडे झुकत चालला होता. प्रकाश कमी होत होता. पर्चर वाढवल्याने फोटोसाठी आवश्यक असलेला प्रकाश कमी होणार आणि त्यावर शेवटचा उपाय म्हणजे आय.एस.ओ वाढविणे. त्यामुळे फोटोमध्येग्रेन्स वाढतात. परंतु, प्राप्त परिस्थितीत ही तडजोड करावीच लागणार होती;आणि अशा सर्व बाजूने सुयोग्य स्थिती पुन्हा मिळेल की नाही याची खात्री नव्हती किंवा अशी संधी मिळायला आणखी किती वर्षे वाट बघावी लागणार याबद्दलही अनिश्चितता होती. शेवटी तडजोड स्वीकारली. पर्चर ९ आणि त्याला आय.एस.ओ १२००ची जोड दिली. आता हवे तसे निकाल हाती येऊ लागले होते. वाढलेले ग्रेन्स, नंतर पोस्ट प्रोसेसिंगमध्ये कमी करायचे, याची खूणगाठ तिथेच मनाशी बांधून टाकली.

..... २०-२५ फोटो काढून झाले. पण काहीतरी सुटतंय, असे वाटत राहिले. आज संधी आहे, पक्षीही पुरेसा वेळ देताहेत तर असेल ती कमतरता पुरी करूच,याचा मनाने ध्यास घेतला. समोरील पक्षी डावीकडून उजवीकडे, नंतर उजवीकडून डावीकडे, असे मागील पक्ष्यांना आडवे जात असतानाचा एकच क्षण माझ्या कॅमेरात येत होता. त्याची मानही खाली-वर, आजुबाजूने हलत होती. मागील दोघे त्यामानाने स्थिर होते. माझ्यामागे सूर्य आणखी पश्चिमेला टेकत चालला होता. अचानक डोक्यात आले की सुयोग्य एक्सपोजर, एकावेळी तीन पक्षी, तेही योग्य रचनेत आले आणि त्याचवेळी त्यांच्या डोक्याची योग्य स्थिती असेल आणि उघडलेल्या अवस्थेतील प्रत्येकाचा डोळा सुस्पष्ट टिपता आला तर छायाचित्रात धमाल येईल. कोणत्याही सजीवाचा डोळा म्हणजे छायाचित्रातील सौंदर्यनिर्मितीचे महत्त्वाचे आणि अनिवार्य अंग आहे. झाले, मला हवा असलेला क्षण तो हाच याची खात्री पटली. आता शेवटच्या या एका फ्रेमसाठी सगळे कसब पणाला लावायची

तयारी झाली आणि मागे सूर्यसुद्धा अंतिम पडावाकडे निघाला. कोणीतरी एकच जिंकणार अन्यथा अशा क्षणासाठी आणखी किती वर्षाची प्रतीक्षा करावी लागणार होती, देव जाणे. फोटोमागेफोटो सुरू झाले, कुणीतरी मान वळवून, किंवा डोळा भलत्याच दिशेला घेऊन, कधी एकमेकांना नको तितके ओव्हरलॅप करून फोटोमधील गंमत घालवत होते. क्लिकवरक्लिक होत होते. या धुमश्चक्रीत काही क्षण हवे तसे टिपले गेले असे वाटले, पण खात्री नव्हती. आणखी पन्नासेकफोटो काढून झाले आणि सूर्याने रामराम ठोकला. नाईलाजाने उठावे लागले. तलावाचा काठ सोडला. जे काही मिळाले त्याबाबत निसर्गाचे मनोमन आभार मानले. घरी येऊन आहे त्या स्थितीतच कॅमेरातील फोटो भरभर चाळत गेलो. आणि सापडला...हवा तसा!हवा तो क्षण टिपला गेला होता. अतीव समाधानाने कॅमेरा गुंडाळून ठेवून आंघोळीसाठी बाथरूम जवळ केली.

*****

**पक्षीवार्ता**

# सारंगागार (हेरॉनरी)

हिंगणघाट पंचायत समिती कार्यालयासमोरील एका कवठाच्या झाडावर दरवर्षी पाणपक्षी घरटी करीत असत. त्यात छोटा पाणकावळा, गायबगळा, छोटा बगळा, रातढोकरी आणि ढोकरी या पाच प्रजातींचे पक्षी असायचे. दरवर्षी घरट्यांचा हंगाम आला की हे पक्षी परत त्या झाडावर येऊन घरटी करीत आणि पिल्लं मोठी झाली की निघून जात. काही वर्षांनंतर, हळूहळू हे पक्षी या कवठाच्या झाडाव्यतिरिक्त इतर झाडांवरही घरटी करू लागले.

असा अंदाज आहे, की ज्या पाणपक्ष्यांनी कवठाच्या झाडावर घरटी केली होती, त्यांची पिल्लं मोठी झाल्यानंतर प्रजननासाठी त्याच ठिकाणी यायला लागली. मागच्या पिढीकडून हीच जागा त्यांच्या प्रजननाची आहे, अशी सूचना त्यांना मिळत असावी. मोठी झालेली पिल्लं घरट्यांसाठी तिथे आली, तेव्हा त्या झाडावर जागा कमी पडू लागली, आणि मग त्यांनी, इतर झाडांवर घरटी करायला सुरुवात केली.

२०११मध्ये हे सारंगागार, ही हेरॉनरी, १६ झाडांवर होती. त्या १६ झाडांपैकी एका झाडाची छाटणी करण्यात आली. त्यामध्ये खूप सारी अंडी नष्ट झाली आणि बगळ्यांची पिलं मरण पावली. ही बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आणि संपूर्ण हिंगणघाट शहराचे लक्ष या हेरॉनरीकडे वळले. या प्रकरणात वनविभागाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर एका मजुरावर गुन्हा दाखल झाला.

२०२१मध्ये पावसामुळे ते कवठाचे झाड उखडले जाऊन पूर्णपणे कोसळले. पण, त्या पडलेल्या भव्य झाडावरील घरटी कायम होती. तेव्हासुद्धा खूप सारे पक्षी व पिल्लं मरण पावली, अंडी नष्ट झाली. त्यावेळी ही हेरॉनरी २८ झाडांवर होती. हेरॉनरीचा अभ्यास करून तिचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या हेतूने २०२२मध्ये घरटी गणनेचे आयोजन करण्यात आले. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ही गणना घेण्यात आली. त्यावेळी, २५९ घरटी आढळून आली, ज्यात सर्वाधिक घरटी गायबगळ्याची होती. त्यावेळी, ३२ झाडांवर घरटी आढळली. म्हणजे २०२१-२२ या एका वर्षात चार झाडांची वाढ झाली होती. पुन्हा, २०२४च्या सप्टेंबरमध्ये घरटी गणना करण्यात आली; त्यात ११६ घरटी आढळली. त्यावेळी, ही हेरॉनरी ३४ झाडांवर होती. म्हणजे एका वर्षात पुन्हा दोन झाडांची वाढ झालेली दिसून आली.

यावर्षी ८ जून २०२५ रोजी घरटी गणना करण्यात आली. त्यात एकूण ३६ झाडांवर ९१५ घरटी आढळली; त्यांपैकी सर्वाधिक ८१० घरटी गायबगळ्याची होती. पुढे, याच वर्षी १४ सप्टेंबर २०२५ रोजी दुसरी गणना करण्यात आली. त्यावेळी जुन्या चार झाडांवर शून्य घरटी होती, तर नवीन तीन झाडांवर घरटी आढळली. नवीन झाडांपैकी देशी बाबुळाच्या झाडावर सर्वाधिक ६५ घरटी आढळली. पाणपक्ष्यांचा घरट्यांचा हंगाम साधारण तीन महिन्यांचा असतो. सर्वप्रथम, मे महिन्याच्या सुरुवातीला पक्षी घरटी करायला सुरुवात करतात.





P. T.O

मे महिन्यात तयार झालेल्या घरट्यांत अंडी देणे, अंड्यांना उबवणे, पिल्लं जन्माला आल्यानंतर, त्यांना खाद्य देणे. पिल्लं मोठी होईपर्यंतचा कालावधी साधारण तीन महिने असतो. म्हणजे मे महिन्यात तयार झालेली घरटी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हंगाम पूर्ण होऊन, त्यातील पिल्लं उडून जातात. मग, तिथे नवीन पक्षी येऊन त्या घरट्यांचा पुनर्वापर करतात किंवा नवीन घरटी तयार करतात. घरट्यांचा दुसरा हंगाम ऑक्टोबरपर्यंत चालतो. नर–मादी जोडीने घरटे तयार करतात आणि पिलांना भरवतात. घरट्यांना विशेष अशी रचना नसते; साधारणपणे छोटे–छोटे काड्यांचे तुकडे ठेवले जातात आणि त्यावरचमादी अंडी घालते आणि उबवते. खूप जास्त पाऊस झाला तर घरट्यांच्या काड्या नरम पडतात. त्यामुळे पक्षी नवीन काड्या आणून घरट्यांची सुधारणा करतात. बरेचदा काड्या नरम पडल्यामुळे अंडी खाली पडतात किंवा कधी कधी पिल्लंही खाली पडतात.

तहसील कार्यालयातील ही हेरॉनरी खूप मोठी आहे. पंचायत समिती, न्यायालय परिसर, तहसील कार्यालय परिसर, जिल्हा परिषद, उपअभियंता कार्यालय, या सर्व परिसरातील झाडांवर ही हेरॉनरी दिसते. काही अधिकारी व नागरिक या हेरॉनरीचा द्वेष करतात. त्याठिकाणी येणारा वास किंवा पक्ष्यांची विष्टा, यांमुळे त्यांच्या मनात नकारात्मक भावना निर्माण झालेली आहे. परंतु, बहुतेक नागरिकांच्या मनात मात्र, या हेरॉनरीबद्दल कुतूहल आहे. 'इथे घरटी करणारे पक्षी कोणते आहेत? ते कुठून येतात? हा घरट्यांचा हंगाम किती दिवस राहतो,' अशा प्रकारचे अनेक प्रश्न ते बरेचदा मला फोन करून विचारतात.

लोकांना माहिती मिळावी याकरिता तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक मोठा बोर्ड लावण्यात आलेला आहे. त्या फलकावर घरटी करणाऱ्या पाणपक्ष्यांची रंगीत छायाचित्रे दिलेली आहेत. तसेच घरट्यांबद्दल संरक्षण कायद्याची माहितीही त्यात दिलेली आहे. या घरट्यांना कायम संरक्षण मिळावे म्हणून आम्ही दरवर्षी घरटी गणना कार्यक्रम घेऊन त्याचा अहवाल नगरपालिका हिंगणघाट, तहसीलदार हिंगणघाट, मा. जिल्हाधिकारी वर्धा, उपवनसंरक्षक वर्धा यांना सादर करतो. त्यामध्ये या घरट्यांना व घरटी असलेल्या वृक्षांना संरक्षण देण्याची मागणी केली जाते. हिंगणघाट नगरपालिकेतर्फे ज्या झाडांवर घरटी होतात त्या झाडांना क्रमांक देऊन त्यांना संरक्षण दिलेले आहे. घरट्यांची झाडांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यासोबतच घरटी करणाऱ्या पक्ष्यांच्या प्रजातीही वाढल्या आहेत. २०२५मध्ये तिथे प्रथम भारतीय पाणकावळ्यांची घरटी आढळली. तसेच, हेरॉनरीतील झाडांवर मोठा बगळा, मोठा पाणकावळा, काळ्या डोक्याचा शराटी, हे पक्षी अनेक वेळा येऊन बसतात. त्यामुळे पुढे या हेरॉनरीमध्ये त्यांचीही घरटी दिसतील, ही शक्यता नाकारता येत नाही.

हिंगणघाट सार्वजनिक बांधकाम विभागाला आम्ही निवेदन देऊन तहसील कार्यालयासमोरील रस्त्यावर देशी बाबुळाची झाडे लावण्याची विनंती केली आहे. सध्या खोटा अशोक, आंबा, करंजी, कडुनिंब, केशिया सेमिया, पिंपळ, देशी बाबुळ, कांचनार इत्यादी, प्रजातींच्या झाडांवर या पाणपक्ष्यांनी घरटी केलेली आहेत. घरट्यांची संख्या दरवर्षी वाढत असून त्यांना नवीन झाडांची गरज आहे. 'निसर्गसाथी फाउंडेशन, हिंगणघाट' आणि 'महाराष्ट्र पक्षीमित्र, वर्धा–जिल्हा'तर्फे दरवर्षी घरटी–गणना करण्यात येते






# हिंगनघाट की हेरॉनरी बनी विदर्भ की सबसे बड़ी

**> 1073 घोंसलों का प्रकृति उत्सव**

**हिंगनघाट.**

हिंगनघाट को इस वर्ष प्रकृति का एक अनोखा सौभाग्य प्राप्त हुआ है। यहाँ स्थित सारंगागार (हेरॉनरी) अब विदर्भ की सबसे बड़ी हेरॉनरी बन चुकी है। इस वर्ष दो चरणों में हुई घोंसला गणना के अनुसार कुल १०७३ घोंसले दर्ज किए गए हैं। इतने बड़े पैमाने पर पक्षियों का प्रजनन होना एक विलक्षण और अद्भुत घटना मानी जा रही है। पक्षी-अध्येताओं के अनुसार, "पक्षियों की यह चहल-पहल भरी बस्ती हिंगणघाट को प्रकृति प्रेमियों के लिए जीवंत प्रयोगशाला बना रही है।" इस गणना का आयोजन निसर्गसाथी फाउंडेशन और महाराष्ट्र पक्षीमित्र, वर्धा जिला के संयुक्त उपक्रम के तहत किया जाता है। 2025 में पहले चरण में 915 घोंसले गिने गए, जबकि दूसरे चरण में यह संख्या 158 और बढ़ी, जिससे कुल संख्या 1073 पर पहुँची। गौरतलब है कि पहले वर्ष यह बस्ती केवल 34 पेड़ों तक सीमित थी, लेकिन इस वर्ष यह बढ़कर 39 पेड़ों तक फैल गई है। हिंगनघाट के नागरिक, स्वयंसेवक और पक्षी-अध्येताओं ने इस हेरॉनरी के संरक्षण के लिए लगातार प्रयास किए हैं। प्रवीण कडू ने कहा, "यह बस्ती केवल पक्षियों का प्रजनन केंद्र नहीं, बल्कि आने वाली पीढ़ियों के लिए प्रकृति का अनमोल खजाना है।" इस कार्यक्रम में नागपुर, वर्धा और हिंगणघाट के पक्षी-अध्येताओं, वन विभाग के अधिकारियों और प्रकृति प्रेमियों ने उत्साहपूर्वक भाग लिया। सभी का मानना है कि यदि इन घोंसलों का संरक्षण सुनिश्चित किया गया, तभी हमारा आकाश हमेशा पक्षियों के पंखों की मधुर गूंज से गूंजता रहेगा।



# सारंगागार (हेरॉनरी) मध्ये पक्ष्यांची १०७३ घरटी

**देशोन्नती वृत्तसंकलन...**


**हिंगणघाट :** विदर्भातील सर्वात मोठी हेरॉनरी येथे दोन टप्प्यांमध्ये घरटी गणना पार पडली. या घरटीगणनेमध्ये घरट्यांची संख्या ही एकहजाराचा वर गेली आहे. हिंगणघाट येथील हेरॉनरी ही सर्वात जास्त घरटी असलेली सर्वात जास्त प्रजनन करणारी विदर्भातील सर्वात मोठी हेरॉनरी ठरली आहे. मराठीतील निसर्गसाथी फाउंडेशन व महाराष्ट्र पक्षीमित्र वर्धा जिल्हा कडून निसर्ग जपण्याचा हेतूने, पक्षी अभ्यास, पक्षी संवर्धन व संरक्षण करून त्यांचा प्रजननाचा अभ्यास करण्यासाठी दरवर्षी घरटी गणना करीत असते २०२५ मध्ये दोन टप्प्यांमध्ये ही घरटी गणना करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात घरट्यांची संख्या ९१५ होती तर दुसऱ्या टप्प्यातील गणनेमध्ये ही संख्या १५८ होती. प्रजननाचा हंगाम हा तीन-तीन महिन्याचा असतो. पहिल्या तीन महिन्यांमध्ये काही पक्षी घरटी करून आपल्या पिल्लांना जन्म देऊन पिल्लांना घेऊन तिथून निघून गेल्यानंतर त्या ठिकाणी दुसरे पक्षी घरटी करतात. या दोन्ही टप्प्यामध्ये होणाऱ्या घरट्यांना मोजल्यानंतर ही संख्या १०७३ आलेली आहे. हिंगणघाट मध्ये पानपक्षी मिश्र विन वसाहत ही एक नैसर्गिक विलक्षण घटना आहे.

या पक्षांचं संरक्षण व्हायला पाहिजे या हेतूने हिंगणघाटातील नागरिक प्रयत्न करीत आहे. मागील वर्षी ३४ वृक्षांवर असलेली ही मिश्र विन वसाहत यावर्षी ३९ वृक्षांवर झालेली आहे. दरवर्षी या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणपक्षी प्रजननाकरिता येत असते त्यांचं संरक्षण आणि संवर्धनाचा विचार करता त्यांच्या प्रजननासाठी उपयुक्त नवीन झाडांची लागवड करणे आवश्यक आहे, अशी माहिती प्रवीण कडू यांनी दिली.

■ घरटी गणनेच्या कार्यक्रमांमध्ये नागपूर, वर्धा, हिंगणघाट येथील पक्षी अभ्यासकांनी सहभाग घेतला होता. प्रवीण कडू, महाराष्ट्र पक्षिमित्राच्या नागपूर विभागाचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे, वन विभागाचे माजी वनपाल अशोक भानसे, ज्ञानचंद गडवाणी, नितीन भोगल, पंचशील थूल, एम. एस. आर. शाद, यशवंत शिवणकर, समीर बक्ष, संतोष धनरेल, वासुदेव पडवे, अंजोर कडू आदींनी सहभाग घेतला होता.

## पुस्तक परिचय

# तळे पक्षी आणि माळरान: एका वेगळ्या विश्वात घेऊन जाणारा लेख संग्रह




साहित्यिक,आदर्श शिक्षक म्हणून सर्वांना परिचित असलेले माणिक पूरी यांचे 'तळे पक्षी आणि माळरान'हे दुसरे पुस्तक.या आधी 'पक्षी येती अंगणी' ही त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झालेली आहे. या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कारही प्राप्त झालेला आहे.

'तळे पक्षी आणि माळरान' अतिशय लालित्यपूर्ण लिहिलेला लेख संग्रह,अर्थातच पक्षी,प्राणी हा विषय घेऊनच लिखाण केलेले आहे.

आजी, तू चिऊ काऊच्या घासासोबत, रान वाचायला शिकवलंस, शिकवलीस पाखरांची भाषा

तू दिलेली इस्टेट मी जीवापाड सांभाळीनया अर्पण पत्रिकेनं या लेख संग्रहाची सुरूवात होते.सोपी आणि ओघवती भाषा वाचकांना खिळवून ठेवते. सापडलं सापडलं म्हणत असतानाच हातातून केव्हा निसटून जाते कळत नाही, अशी अवस्था वाचकांची होते. प्राणी किंवा पक्षांच्या सानिध्यात लेखक वाचकाला घेऊन जातो,वाचत असताना कधी न अनुभवलेले किंवा न पाहिलेले काही तरी अद्भूत आपल्याला पाहायला मिळणार आहे या आशेवर वाचक पुढे सरकत असतो. नुकतेच रांगायला लागलेल्या बाळासमोर खेळणं ठेवावे आणि बाळ जवळ येताच आणखी दूर सरकवत न्यावे अशी अवस्था पुरी वाचकांची करतात. वाचकही पुढे सरकत राहतो.काही तरी अमुल्य माहिती सापडल्याचा आनंद वाचकाला मिळतो परंतु प्रतिक्षा करायला लावण्यात लेखक बऱ्यापैकी यशस्वी झालेला असतो. कुठल्याही गोष्टीचा सहज उलगडा होत असेल तर आनंद उपभोगता येत नाही हेही तितकेच खरं.

'तळे पक्षी आणि माळरान' या पुस्तकात एकूण पंधरा लेख आहेत, पक्ष्यांच्या बाळंतपणाची गोष्ट हा संग्रहातील पहिलाच लेख, लांडोर ते चिमणी पर्यंतच्या बाळंतपणाची सखोल माहिती देणारा लेख. लेखकाच्या आजीचं आणि पक्ष्यांचं नातं अतिशय हळुवारपणे पुरी यांनी रेखाटले आहे. हेच पहा ना.एक लांडोर पायवाटेवरून आडवी गेली. तिच्या पाठोपाठ पाच पिलं सुध्दा होती, एवढं सुंदर दृश्य. ती लांडोर ओढ्यात उतरण्यापूर्वी आजीकडे पहात होती.

आजी ती लांडोर तुझ्याकडं पाहत होती का गं?लेखक विचारतात.

लांडोर तिच्या पिलांना घेऊन भेटायला आली होती.आजी म्हणाली.

एखाद्याच्या डोळ्यात पाहून त्याला काय म्हणायचंय याची जणू विद्याच आजीनं हस्तगत केली होती. असे मानवी मनाला ऊर्जितावस्थेत नेणारे अनेक प्रसंग या पुस्तकात रेखाटले आहेत. चिऊ काऊच्या गोष्टी सांगणाऱ्या, घराला घरपण देणाऱ्या आजी घरातून हद्दपार होत चालल्या आहेत.अशी खंतही लेखक शेवटी व्यक्त करतात. या पहिल्याच लेखाने वाचकांच्या मनाचा तळ गाठलेला आपणास दिसून येतो.

माळढोक आणि लखनगाव, हा लेख सुध्दा प्रत्येकाला विचार करायला भाग पाडणारा आहे. माळढोक पक्ष्यावरील हा लेख निसर्ग आणि पक्षी प्रेमी लोकांना विचार करण्यास भाग पाडणारा आहे,कारण माळढोक पक्ष्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. माळढोक पक्ष्याचा अधिवास शोधण्यासाठी लेखकाने बरीच भटकंती केलेली दिसते. या भटकंतीत काही निरिक्षणे लेखकाने मागे सोडले आहेत. अभयारण्यात भटकताना चारही बाजूला गवत कंबरेपर्यंत पोहोचलेलं, त्याचा पिवळा रंग फिका पडू लागला. वाळत चाललेल्या गवतातून अनेक प्रकारचे नाकतोडे हातावर येऊन बसत. हात झटकला की पाच सहा नाकतोडे गवतात पडत.टोळधाड येऊन गेल्यानंतर काही टोळ आपला वंश पाठीमागं ठेवतात तसं तर नसावं? अशी बारीक निरीक्षणंही लेखकाच्या नजरेतून सुटत नाहीत. एखादे मच्छर आपल्या भोवती घोंगावू लागले तर आपण चिडतो,इथे तर पाच सहा नाकतोडे हातावर बसतात. मग पायांवर, अंगावर किती बसत असतील!हे सगळं वाचताना आपल्या अंगावर काटा येतो.तर असे हे,एकाच्या शोधात असताना दुसरेच काहीतरी हाताला लागून जाते,हे लेखकाच्या भटकंतीत अनेकवेळा घडलेले दिसते.

माळढोकनं घशातून काढलेला 'हूम'असा आवाज वाचकाला कुठेतरी गूढ वातावरणात घेऊन जातो. विणीच्या काळात माळढोकनं हंबरण्यासारखा काढलेला आवाज दूरपर्यंत ऐकू येत असतो.एकमेकांना साद घालण्यासाठी ते अशी हाक देत असतात. असे अनेक गूढ निरीक्षणं लेखकाने पानोपानी नोंदवली आहेत.

पाडस हा लेख वाचतानाही मनाला चटका लावून जातो.पाडस म्हणजे हरिणीचे पिल्लू गोंडस आणि भित्रेही तेवढेच,भटकंतीत लेखकाच्या नजरेतून सुटत नाही.दूरवर पसरलेल्या गवतात एकटच निराधार होऊन बसलं होतं. त्याची आई कुठे असावी? त्याला कळपातून बाहेर ढकलायला तसं त्याचं वय सुध्दा नव्हतं. त्याचे सवंगडी कुठे गेले?असे अनेक प्रश्न लेखकाला पडलेले असतात.सगळं माळरान हुंदडणारं पाडस एका जागेवर खिळून बसलेलं बघवत नसतं.लेखकाला पाहून त्याच्या मनात अनेक विचारांची वावटळ तयार झालेली असते. पाडसाचे उभारलेले कान,भोकराएवढे काळे डोळे, डोळ्याभोवती पांढऱ्या रंगाचे वर्तुळ. नाकपूडी काळसर,पोटाखालचा भाग पांढऱ्या रंगानं चित्तारलेला.सोनेरी रंगाची पाठ.हे सगळं लेखक डोळ्यात साठवत असतानाच ते उभे राहते आणि काही कळायच्या आत मेडशिंगीच्या दिशेने झेपावतं.पाडस धडधाकट असते, त्यानं मारलेल्या उड्या डोळ्यात साठवत लेखक रानवाटेनं मागे फिरतो. असे अनेक विलक्षण अनुभव, प्रसंग आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळतात.

अस्वलाचे झाड, रानडुक्कर,वाघ,घारीचं झाड,निवळीचे तळे,निलगाय आणि तरस, इत्यादी लेख वाचनीय आहेत. या पुस्तकावर अनेक लेखकांनी परिक्षणं लिहीली आहेत, बोलल्या गेलं आहे.सुबक छपाई, मुकुंद धुर्वे यांचे बोलके आणि मनमोहक मुखपृष्ठ या सर्व गोष्टी लक्षात घेता 'तळे पक्षी आणि माळरान' हा लेख संग्रह वाचनीय झाला आहे.माणिक पूरी यांच्याकडून अशीच निसर्गाशी नाते जोडणारी साहित्य निर्मिती निर्माण होवो अशी सदिच्छा.

**बाबा कोटंबे**
परभणी

## टपाल तिकिटांच्या दुनियेत

# हुदहुद
## Common (Indian) Hoopoe



**रवींद्र वामनाचार्य**
जेष्ठ पक्षी अभ्यासक, नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

'हुदहुद' हा पुत्र प्रिय या कुळातला एकमेव वंशज आहे. 'हुपो वा हुपू'त एकच जात आहे. इतर जाती उपजाती हुपोमध्ये नाहीत. हा एक अतिशय सुंदर पक्षी आहे. हा साधारण ३१ सेंमी (एक फूट) लांबीचा असून याच्या पंखावर व शेपटीवर झेबऱ्यासारखे काळे पांढरे पट्टे असतात. पाठ, मान, तोंड व कंठावर उजळ तांबडा रंग असतो. डोक्यावर दहा–बारा पिसांचा सुंदर असा तपकिरी लाल रंगाचा तुरा असतो. टोकावर काळे पांढरे पट्टे असतात. याची चोच लांब कुदळीसारखी असते.

हुदहुद या पक्षाला काही लोक सुतार पक्षी असेही संबोधतात;मात्र तो सुतार पक्ष्यांच्या कुळातला नाही. हा पक्षी साधारणतः जोडीने किंवा समूहाने आढळतो. याचे वास्तव्य माळरानावर, विरळ जंगलातील पाऊलवाटेवर, शहरातील झुडपी माळरानातही आढळते. वनराया, उद्यानातील हिरवळीवर मातीत तोच खूपसूनकिडेमकोडे खात असतो. हे किडे, कीटक पिकांचा नाश करणारे असतात व त्यांना हा खात असल्याने तो शेतकऱ्यांचा मित्र समजला जातो. हा, फेब्रुवारी ते मार्चपर्यंत झाडाच्या ढोलीत घरटे बांधतो. भिंतीतल्या व छतावरील बिळातही घरटे करतो. गवत, चिंध्या, केस आणि इतर घाणेरड्या वस्तू घरट्यासाठी वापरतो. मादी पाच ते सहा पांढरी अंडी घालते. नर आणि मादी पिलांना चारा भरवितात.

अन्नशोधनासाठी जमीन उकरतांना तुरा मिटलेला व आक्रसून घेतलेला असल्यामुळे त्याचे टोक डोक्यामागे शेंडी सारखे लोंबताना दिसते. त्याला डिवचले किंवा त्याला धोक्याचा इशारा मिळाला तर लगेच हा तुरा पंखाप्रमाणे उघडला जातो. त्याचे मधुर गाणे म्हणजे हुऽपो किंवा हुऽपोऽपो असा आवाज असतो. हे गाणे एकसारखे व बराच काळ टिकणारे असते. छातीवर चोच आडवी करून हा पक्षी आरोळी देतो.

अनेक लोककथांमध्ये हुदहुद पक्ष्याचे महत्त्व आहे. ज्यू अख्यायिकांमध्ये राजा सालोमनलाशेबाच्या राणीला भेटायला घेऊन जाण्यात या पक्ष्याची भूमिका होती. हुदहुद हा पक्षी इस्रायलचा राष्ट्रीय पक्षी आहे.मात्र, ती प्रजाती भारतात आळणाऱ्याहुदहुदपेक्षा वेगळी आहे.

अशा या सुंदर पक्ष्यावर इस्रायलच्या टपाल विभागाने तीन पक्ष्यांच्या मालिकेत टपाल तिकीट जारी केले आहे. प्रथम दिवस आवरणावर हुपो पक्षाची मुद्रा अंकित केली आहे. तसेच चंदीगड येथे जिल्हास्तरीय टपाल तिकीट प्रदर्शनातील विशेष आवरणावर हुपो पक्ष्याची मुद्रा कॅन्सलेशनवरमुद्रीत केली आहे.

*****






# ADVENTURE HUB MH



## Eco Tourism & Adventure Sports


**Manish K. Dhakulkar** (Adventure expert)
*Basic Mountaineering Course at NIM, Uttarakhand*
9359840725
adventurehubmh7@gmail.com




**Zipline**



**Sky Cycling**



**Giant Swing**

## Bhimkund Adventure Park Chikhaldara

### Other Activities

- Nature Walk / Trekking / Hiking
- Bird Watching + Presentations
- Butterfly Walk + Presentations
- Wildlife Presentations
- Adventure Activities, ( Zipline Sky cycle, Wall Climbing, Low rope course Etc.)
- Personality Development Activities
- Gypsy Safari
- Environmental education & Details About Wildlife Awareness
- All Flora and Faun Details Presentations
  Sports Actives (Cricket, Volleyball, Badminton etc.)
- Tent Camping (Customize for all Ege groups)









## Wasali Adventure Park Sonala (Buldhana)

*Affiliated with*

INTACH

adventure_hub_mh / the_core_life

# 'काळा करकोचा' (ब्लॅक स्टॉर्क)



अनेकवेळा प्रयत्न करून या पक्ष्यांचे फोटो काढून झाले. पण, मनात असलेल्या आदर्शवत स्थितीची गाठ, काही केल्या पडत नव्हती. मात्र, २०२२ च्या मे महिन्याची ती संध्याकाळ खास कृपावंत झाली. अमरावतीमधील सावंगा,मालखेड तलावावर विविध टिलवा पक्षी आणि राजहंसाचा छोटा थवा अगदी निवांत खाद्य टिपत फिरत होता. आणि दूरवर-समोरच्या काठावर-उंच चार काळे ठिपके पाण्यात भक्ष्य शोधत होते. ते काळे ठिपके काळया करकोच्याचेच होते, हे जरा वेळाने लक्षात आले. मात्र, मनासारखे फोटो टिपायचे म्हटले तर हे अंतर खूप जास्त होते. फार आशा लावून बसण्याला अर्थ नव्हता.

त्यामुळे, आहे तिथे जमिनीवर लोळण घेऊन राजहंसाच्या विविध हालचाली कॅमेराबद्ध करणे सुरू केले.



**मनोज बिंड**
छायाचित्रकार, अमरावती

Book Post

प्रति,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पण, समता कॉलनी
कठोरा रोड,अमरावती
४४४ ६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
**संपादक : किरण मोरे**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : **ज्ञानपथ प्रकाशन**
**मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन**